म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ~~कवि~~ चा.वा.
दा. क्र. 9044

BVBK-0401055
BVBK-0401055

सोन्याचा बूट.

बुद्धिविकास माला क्र. ७

# सोन्याचा बूट

( किशोरांसाठी कथा )

म. ग्रं. सं. कार्य, बाल वाचन शाखा.
बाल वाचनालय व ग्रंथ
दा. क्र. १०५६६ दिनांक ...
विषय किशोर क्र. ५५२

(सौ. शैलजा राजे)

BVBK-0401055

संजय प्रकाशन, पुणे ४

१९७५

जय प्रकाशन : एक्काहत्तर

✦ ✦

प्रकाशिका :
सौ. ललिता शंकर भावे
संजय प्रकाशन,
९१७/२२ फर्ग्युसन कॉलेज रोड
पुणे ४.

✦ ✦

© सौ. शैलजा राजे
३०८ सोमवार पेठ
पुणे ११

✦ ✦

प्रथमावृत्ती
एक ऑगस्ट १९७५
आषाढ वद्य ९ शके १८९७

✦ ✦


मूल्य तीन रुपये

✦ ✦

सजावट : सौ. संध्या मुधोळकर

✦ ✦

मुद्रक
श्री. ज. ता. गायकवाड
मायबोली मुद्रणालय
४०५ नारायण पेठ, पुणे ३०



गचकन् धक्का बसला आणि मधू खाडकन् जागी झाली. किती सुंदर स्वप्न पडत होतं तिला. जागी झाली तरी तिला पुन्हा त्या स्वप्नातच जावंसं वाटत होतं. काय छान होती ती जागा. धड ना हिरवी, धड ना पिवळी, की खरं तर आकाशीही नाही अशी कसल्यातरी वेगळ्याच रंगाची ती जमीन होती, मऊ मऊ! सावरीच्या कापसात तरी मधूनच एखादी गाठ लागते, पण त्या जमिनीत एकसुद्धा, अगदी लहानसासुद्धा खडा नव्हता. पाय टेकला तर कसं छान वाटलं होतं. गुबगुबीत दुलईवरून चालल्यासारखं. मधू तर मुद्दाम एकेक एकेक पाऊल अगदी जोरात रोवून चालली होती. बरोबर कितीतरी मुलं होती. कुणी गोरी, कुणी काळी, कुणी तर अगदी गाजरासारखी लाललाल दिसत होती. एका मुलाचा गाल तर जसा काही पिकलेला टोमॅटोच. मधूला तर वाटलं होतं, जावं आणि कचकन् त्यात दात रोवावा. पण तो मुलगा खूप लांब होता. एक पिवळी धमक, पिचपिच्या डोळ्यांची मुलगी होती. त्यावेळी तर मधूच्या मनात आलं होतं, आपला

लाल रंगाचा फ्रॉक हिला घालायला दिला तर झक्कास हळदीकुंकू तयार होईल.

नुसती मुलंच काय, तिथलं सगळंच छान होतं. जमीन तर मऊ रेशमासारखी होतीच, पण त्या जमिनीवर उगवलेली झाडंसुद्धा कशी सोनेरी होती. पानं सोन्याची, फुलं हिऱ्यामाणकांची, वागडणारे पक्षी चिमुकले, पण कसे मोरासारखे सुंदर. चिमुकल्या पिसाऱ्यांचे. इवल्याशा तुऱ्याचे. सगळं पाहून मधू भान हरपली होती. आनंदानं गाण्यासाठी तिनं आ केला आणि गपकन् धक्का बसला. मधू खडबडून जागी झाली.

मधूनं इकडे-तिकडे पाहिलं. सगळे लोक होते तसेच होते आपापल्या जागी. मग एकदम हा धक्का कसला ? तिनं मागे वळून पाहिलं. तिची ममी डोळे मिटून बसली होती. आणि बाबा कसलंतरी भलंजाडं पुस्तक वाचत होते. तिच्या शेजारचा जाडचा ढेरपोटचा तर चक्क घोरत होता. मग ? धक्का काय फक्त तिलाच बसला होता ! दुष्टच दिसतोय मेला. किती सुंदर स्वप्न होतं. नक्कीच एखाद्या परीराणीचं, अलीकडे तिला परीराणीच्या गोष्टी फारशा आवडत नव्हत्या. सगळ्याच कशा उगीच गुळगुळीत वाटायच्या. खरं तर त्यात गंमत अशी नसायचीच. पण म्हणून काही पूर्वी वाचलेलं विसरता थोडंच येतं. त्या परीराणीच्या राज्यातल्या पऱ्या, देवदूत, मंतरलेली माणसं, राक्षस, सैतान, सगळं तेव्हा मोठ्या चवीनं ती वाचायची पण आता खरं तर त्यातला इंटरेस्ट संपला होता. त्यात काही थ्रील नव्हतं. लहानपणी बरं असतं आपलं. सगळं कसं खरं वाटतं. आजी म्हणायची, " मधू खोटं बोलायचं नसतं हो ! देवबाप्पा कान कापतो."

आणि मग आजी देवबाप्पानं कान कापलेल्या कितीतरी

मुलांच्या गोष्टी सांगायची. मधू धडधडत्या छातीवर हात ठेवून आजीच्या मांडीवर डोकं ठेवून सारं ऐकायची. पण आता ? ऊं! सगळंच झंपट ! नुसतीच ओम ढोम ! आता त्यात काय मजा नव्हती. हल्ली आवडायच्या मस्तपैकी हेरगिरीच्या कथा. ढिशूम ढिशूम ! अंगावर कसा काटा यायचा मारामारीची वर्णन वाचताना. ले-लेजाव मजा असायची. अलीकडे आजीतला इंटरेस्ट खरं तर संपलाच होता. तिला आपलं अजूनही वाटायचं, मधूनं यावं, मांडीवर लोळावं. खडीसाखर चघळावी न् गोष्ट ऐकावी. आजीला वाईट वाटू नये म्हणून मधून मधून मधू आजीजवळ बसायची. लोळाय-विळायची मात्र नाही. स्टार्च केलेला फ्रॉक चुरगळला की बांधाच ! बरं खडीसाखर खाण्याचे का आता दिवस होते. जंबो आईस्क्रीमची, चॉकोबारची लज्जत आजीला काय सांगावी ! तिला ते कळणार नाही, न् आपल्याला ते नीटसं सांगता येणार नाही. मग मधू आपली गप्पच बसे. आजी काहीतरी विचारी, मधू काहीतरी उत्तर देई. बस्स !

मधू-स्वतःशीच हसली. कुठून कुठे आली होती ती ! आता काय आजीची आठवण यायची गरज होती ? पण हे असंच काही तरी अलीकडे होत होतं. मैत्रिणींशी बोलता बोलता मध्येच दुसरंच काहीतरी आठवत राहायचं. बोलण्यातलं लक्षच उडायचं न् मैत्रिणी म्हणायच्या, "मधू भारी शिष्ट झालीय."

मग मधूला वाईट वाटायचं, ती मुळीच शिष्ट झाली नव्हती. त्या सगळ्या मैत्रिणी तिला आवडत होत्या. ती होती तशीच होती. बरं तिचा पहिला दुसरा नंबर काय यंदाच थोडा आला होता ? पहिलीपासून आता आठवीपर्यंत ती नेहमीच पहिल्या पाचात असायचीच. पण हे असं काहीतरी झालं होतं खरं. काय ते तिचं

तिलाही कळत नव्हतं. यावरून खरं ती आजीची एवढी लाडकी असून तिच्याकडूनही कधी कधी रागवून घ्यायची. ममी तर सदाच म्हणायची " धांदरट ! नादिष्ट झालीय हल्ली. I am simply worried about her ! "

एकटे बाबा तेवढे तिचं मन जाणायचे. कधी तिला रागवायचे नाहीत. म्हणायचे, " अग अशीच असतात या वयातली मुलं. जरा संभाळून घ्यायला हवंय तिला."

आता जागी झाली न् हे एवढं सगळं भारूड मधू आठवत राहिली. आणि मग त्या घोळात आपल्याला कसलातरी धक्का बसला होता हेच विसरली. बाबांच्या हातातल्या जाड पुस्तकाकडे पाहात राहिली. केवढं जाड आणि जडसुद्धा असेल हे पुस्तक ? कसलं असेल बरं ? बाबा नेहमीच ही असली पुस्तकं वाचत असतात. त्यातल्या काही गंमती केव्हातरी जेवताना मित्रांना सांगत असतात. आणि मग मित्र विचारतात, " Really ? wonderful."

खरं तर आपल्यालाही विचारावंसं वाटतं, " बाबा, असं काय आहे हो त्यात Wonderful ? मला सांगा ना ! "

पण ममीची भीती, बाबांच्या मित्रमंडळीत उगाच लुडबुड करायची नाही अशी तिची सक्त ताकीद ! ती मात्र सर्वांच्यात बसते, बोलते, मित्र, मित्रांच्या बायका, ममी सगळे काय काय धमाल करीत असतात. ट्रिपा काय, पिकनिक काय, पार्ट्या काय न् डिनर काय ! आपण मात्र आजीच्या सोबतीला घरी. म्हणे मुलांना नाही न्यायचं !

मधू स्वत:शीच कुरबुरली न् तिनं डोळे मिटले. तिच्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. ममी तर डोळे मिटूनच बसली होती. बाबा त्या लठ्ठभारती पुस्तकात रमले होते. मग तिनं तरी काय करावं ?

जमलं तर ते छानसं स्वप्न परत पाडता आलं तर पाहावं म्हणून तिने डोळे मिटले. स्वप्न नाही पण तिला मग मिटल्या डोळ्या-नीच काय काय दिसायला लागलं. काका, काकांचं घर. तिथला मोठ्ठा राजा कुत्रा. हे काहीच तिनं खरं तर पाहिलेलं नव्हतं. पण पत्रातून वाचून, ऐकून तिला ते जसं स्पष्ट दिसायला लागलं होतं. आताही डोळे मिटले तेव्हा तिला ते सगळं दिसत राहिलं. काकांचा राजा कुत्रा तर म्हणतात खूपच दांडगा होता. एखाद्या लांडग्यासारखा. तिनं लांडगा तरी कुठं पाहिला होता म्हणा, पण ममीच तसं सारखं सारखं बोलायची म्हणून मधूला माहीत झालं होतं.

आता ती, ममी आणि बाबा काकांच्याकडे निघाले होते. तिचे काका सैन्यात मोठे अधिकारी होते. खूप लांब, काश्मीरच्या कुठल्यातरी गावात त्यांना बंगला मिळाला होता. आणखी दोन महिन्यांनी ते रिटायर होणार होते आणि म्हणून मग त्यांनी आग्रहानं मधूला तिकडे बोलावलं होतं. काकूनं तर खास मधूलाच पत्र लिहीलं होतं. त्यात तिनं म्हटलं होतं,

"मधू तुला आमचं हे कुलगाव खूप आवडेल. तुमच्या पुण्या-मुंबईसारखं मोठ्ठं नाही. आहे अगदी छोटसं. पण फारच छान आहे. आमचा बंगला आहे ना, त्याच्या मागच्या बाजूला नदी आहे. कडेला हिऱ्यासारखे चमकणारे डोंगर आहेत. कसले माहीत तर आहेत का ? सह्याद्रि, सातपुड्यासारखे दगडा-मातीचे नाहीत. वर्फाचे. त्याच्यावर दुपारी ऊन पडलं की असे चकाकतात, जसे काही रत्नमाणकांचे खडेच त्याच्यावर पसरले आहेत. आणि तुला फुलं खूप आवडतात ना ? तुमच्या दारात पारिजातकाचा सडा पडला की तू किती नाचतेस् ते मला चांगलं आठवतंय्. आणि जाईजुईच्या गजऱ्यांचं तुझं वेड तर मी कधीच विसरणार नाही. पण त्याहीपेक्षा

इथं फुलांचा राजा जो गुलाब ना, त्याचे गेंदच्यागेंद तुला पाहायला मिळतील. तू येच इकडे. मी रोज तुला गुलाबाच्या पाकळ्यांचाच ड्रेस घालीन. आक्रोड, बदाम असला खुराक देईन. इथल्या काश्मिरी मुली बघ, कशा असतात ते. तुझे गालही मी तसेच गुलाबासारखे गुलाबी गुलाबी करून पाठवीन. पण ते रूज वगैरे लावून नाही हं. अगदी खरे खरे. काश्मिरी ड्रेससुद्धा शिवणारं आहे मी तुला. तो घातलास की तू अगदी त्या काश्मिरी मुलींच्यात खपून जाशील बघ. आमची आम्हालाच ओळखता येणार नाहीस."

डोळे मिटले आणि मधूला काकींच ते सारं पत्र आठवलं. तिला तिची काकू खूप आवडायची. काकूनं खूप जग पाहिलं होतं. तिचे काका कुठं कुठं जायचे. त्यांच्याबरोबर तीही जायची. मग जिथं जिथं जायची, तिथून तिथून मधूसाठी कांही ना काही आणायची. मधूजवळ जेवढ्या गोष्टी होत्या तेवढ्या दुसऱ्या कुठल्याच मैत्रिणीकडे नव्हत्या. खरं तर मधूच्या मैत्रिणी तिच्या या वस्तू पाहून कशा हरकून जायच्या. आता येताना त्यांनी सर्वांनीच मधला काय काय आणायला सांगितलं होतं. आणि त्या सर्वांना काही ना काही आणायचंच असं मधूनही ठरवलं होतं. निदान काश्मीरची सफरचंदं तर ती नक्कीच आणणार होती. तसं तिनं काकूला आधीच कळवून ठेवलं होतं.. तिला निदान शंभर तरी सफरचंद हवी होती.

डोळे मिटून मधू काय-काय बेत करीत होती. आधी तिला राजाशी दोस्ती करायची होती. काकू दर पत्रात राजाचं कौतुक करायची. राजा म्हणजे काकूचा जसा मुलगाच होता. कधीतरी

ममी म्हणायची, "मूल नाही स्वतःला न् मग करायचं कुत्र्यावर प्रेम !"

मधूला वाटलं ममीला हाक मारावी न् परवाचा काकूनं पाठवलेला राजाचा फोटो मागून घ्यावा. ममीच्या पर्समध्येच ठेवला होता तो मधूनं. पण ममी अगदी शांत झोपली होती. विमानात ममीला एवढी कशी शांत झोप लागली ? एरवी तर म्हणते, 'मला झोप येत नाही' आणि आता ?

बाबा वाचनात रंगले होते. मागे वळून त्यांच्याशी बोलण्यात काही अर्थ नव्हता. खरं म्हणजे तिला बाबांच्या शेजारी बसायचं होतं. पण तिच्या तिकिटावर तिचं नाव आणि नंबर एगळं होतं, आणि तिला तिथंच बसावं लागलं त्या लठ्ठंभारतीच्या शेजारी. कसातरीच दिसत होता तो. अंगात सूट मारे भारी कापडाचा होता. चांगला चकाकत होता. टायही मस्त सोनेरी होता. पण खरं तर त्याला काहीच शोभत नव्हतं. चेहरा कसातरीच वाटत होता. गाल एकावर एक बॉल ठेवल्यासारखे वाटत होते. न् नाक ! शी ! त्या नाकातले केस एवढे मोठे होते की ते बाहेरच डोकावत होते. आणि घोरत तर असा होता की जशी काही रेडिओतली खरखरच !

त्याच्याकडे पाहता पाहता मधू खुदकन् हसली. तिच्या मनात आलं, आपल्या केसाची हेअरपिन काढून जर त्या ढेरपोटयाच्या गालात टोचली तर फसकन् हवा बाहेर येईल न् पंक्चर झालेल्या टायरसारखा त्याचा गाल चप्पट होईल. तिनं चाळा म्हणून केसाची पिन् काढलीही आणि पुन्हा गचकन् धक्का बसला. आता मात्र तो बहुतेक सर्वांनाच जाणवला. कारण पहिली जागी झाली ममी

आणि तिनं बाबांच्या दंडाला धरून घाबरत विचारलं, " काय झालं हो ? एकदम धक्का कसला बसला ?"

बाबांनी हातातलं पुस्तक मिटलं. जरा इकडे तिकडे पाहिलं. सारं शांत होतं. म्हणजे ती एअरहोस्टेस नावाची सुंदर मुलगी आतल्या बाजूला होती. प्रवासी मात्र सर्व थोडे ताठ झाले होते. मधूनंही बाबांच्याकडे पाहिलं. बाबांनी तिच्या डोक्यावर थोपटत म्हटलं, " कुछ नहीं बेटा. अग आपली गाडी कशी रस्त्यावर एखादा खड्डा किंवा दगड वगैरे आला की गचकते, तसं काहीतरी झालं असावं. एखादा ढग आला असेल वाटेत. नाहीतर वाऱ्याचा मोठा झोत ग ! "

मधूला ते ऐकूनच मजा वाटली. ढग वाटेत आला आणि त्यावरून विमान गेलं. काय मज्जा, खरं तर वाटत होतं खिडकीतून हात बाहेर काढावा. ढगांना लावून पाहावा. पण काचेची खिडकी अगदी बंद. नुसतंच सारं आपलं पहायचं. विमान रात्री दिल्लीला पोचणार होतं. तिथून दुसऱ्या विमानात बसायचं होतं. जम्मूला उतरायचं होतं. तिथंच रात्री राहायचं न् मग सकाळी काका जीप घेऊन येणार होते. म्हणजे ती विमानात असतानाच चंद्र उगवणार होता. अगदी हाताशी असल्यासारखा दिसणार होता. पण काही उपयोग नव्हता. जरा बाहेर हात काढायला मिळायला हवा होता. मधूला ढगांना हात लावायची फार फार इच्छा होती. पण– !

ती हळूच बाबांना म्हणाली, " बाबा मी तिकडे जाऊ ?"

" कुठं ?" बाबांच्या ऐवजी ममोनंच चिडून विचारलं.

" कुठं नाही जा ! तू कशाला विचारतेस ? आता माझं काम होणारच नाही. कुथवलंस ना तू ! "

बाबांनी तिच्या डोक्यावर एक टप्पल मारली. ते हसत हसत म्हणाले, " जा ! त्या पायलटशी गप्पा मारून ये. एअर होस्टेसही तिथंच आहे. जा ? पळ !"

" Thank you Baba ! Thank you very much ! "

मधू आनंदानं बोलली न् त्या ढेरपोटयाकडे पहात पहात पायलट केबिनकडे निघाली. ढेरपोटया अजूनही सुस्तावलेलाच होता. जाता जाता उगाचच मधूनं त्याच्या पायावर पाय दिला. खोडी काढायची म्हणून. मधूच्या पायात मऊ स्पंजचे बूट होते. तरीही मधूला वाटलं त्याचा पाय कसा दगडासारखा आहे. त्यानं पायातले बूट काढून ठेवले होते. नुसते मोजे घालूनच तो बसला होता. खुळाच वाटत होता.

मधू पायलटच्या केबिनमध्ये गेली न् खूप गप्पा करीत राहिली. ती एअरहोस्टेसही छान होती, नीलांबरी तिचं नाव. मधू तिला म्हणाली, " तुमचं नाव किती छान आहे. आणि खरंखरं आहे. "

" म्हणजे काय ! तुझं माधुरी हे नाव काय खोटं आहे !"

"तसं नाही हो ! तुमचं म्हणजे अगदी खरं आहे. तुम्ही नेहमीच निळ्या अंबरात म्हणजे आकाशात फिरता ना म्हणून नीलांबरी हे नाव अगदी खरं नाही का !"

" मग तू अगदी मधासारखी गोड आहेस ना म्हणून माधुरी ! हेही नांव खरंच आहे नाही का ?"

मधू नंतर त्या दुसऱ्या पायलटशी बोलत होती. एक पायलट तर अगदी गुपचूप बसला होता. त्याच्या हातात होतं विमानाचं चाक. तो इकडे पहात नव्हता की तिकडे पहात नव्हता. मधू त्याच्याकडे पहात त्या दुसऱ्या वैमानिकाला म्हणाली, " हे अगदी एवढे गप्प का बसतात ! आमचे बाबा तर गाडी चालवताना

चिक्कार गप्पा मारतात. सिगारेटसुद्धा ओढतात. खरं तर गाडी चालवण्यापेक्षा विमान चालवणं सोपं असेल नाही का ! कुणी मध्ये यायला नको. आपलं नुसतं चालवत राहायचं. हॉर्न वाजवायला नको, ब्रेक लावावयास नको. मीपण मोठी झाले की विमान चालवायला शिकणार."

एवढा वेळ गप्प असलेला तो वैमानिक हसला. मग दुसरा म्हणाला, "इकडे ये. हे कानाला लाव. काय ऐकू येतंय ? येतय का काही ऐकायला ?'

मधूनं त्यानं दिलेला पट्टा थोडा वेळच कानाशी लावला. बापरे, कसले कसले आवाज ऐकू येत होते. कडकट, कडकट तर सारखंच सुरू होतं. मधूनं झटक्यात तो पट्टा काढून टाकला. म्हणाली, "कान किटले माझे. हे सारखे कसले आवाज येताहेत ? आणि घो घो तर केवढा !

"मग ? विमान चालवणं सोपं म्हणतेस ना ? बघ. हे सगळे आवाज काय काय सांगत असतात. इकडून जा. तिकडे मोठा ढग आहे. पलीकडल्या टप्प्यात एक विमान आहे. तुमचा मार्ग डाव्या बाजूनं आहे."

"अय्या ! म्हणजे रस्त्यावर असतात तसेच इथं आकाशातही डावे-उजवे रस्ते असतात ? गंमतच आहे म्हणायची."

मधूच्या गप्पा खरं तर संपल्याच नसत्या. पण ती नीलांवरी तिला म्हणाली, "चल जागेवर. मी आता तुम्हाला जेवण देणार आहे. तुला छान छान आईस्क्रीम देते. सँडवीच् देते. न् मस्तपैकी चॉकलेटस्."

आईस्क्रीम न् चॉकलेचं नाव ऐकल्याबरोबर मधू जागेवर आली. ढेरपोटचा आता जागा झाला होता. न् पायात बूट घालत

होता. मधू उगाचच त्याच्या बुटाकडे पहात राहिली. तिला वाटलं ह्याचे बूट आपल्यासारखे नाहीत. वेगळेच आहेत. आणि त्याचा पायही कसा वेगळाच दिसत होता. मधूला त्याच्याशी बोलायची लहर आली. तिनं विचारलं, "तुम्ही कुठं जाणार ? दिल्लीला?"

"नाही. तुम्ही ? "

"आम्ही कुलगावला जाणार. काकांच्याकडे. माझे काका ब्रिगेडियर आहेत. आणि बाबा ऑफिसात आहेत."

"कुलगाव ! म्हणजे तुम्ही जम्मूला मुक्काम करणार ! "

"हो ! तुम्हाला कसं कळलं !"

तो नुसताच हसला. त्यानं आपला कोट नीट बटणं वगैरे लावून अंगात घातला. मधू म्हणाली, "आता आपलं जेवण येईल. तुम्ही काय घेणार ? मी आईस्क्रीम खाणार ? नीलांबरी मला चॉकलेटसही देणार आहे."

"मी फक्त दूध घेणार. माझा उपास आहे."

"आज कसला उपास ! आज तर बुधवार आहे. बुधवारी कधी कुणी उपास करतात वाटतं ?"

पण मधुच्या या प्रश्नावर तो काहीच बोलला नाही. त्यानं कोट अंगात नीट घट्ट बसवून टाकला. बूट घातले. आणि तो वाचत बसला. मधूनं पुन्हा त्याला विचारलं "दिल्ली यायला अजून तास आहे ना ? मग आत्तापासून सगळं चढवून बसलात ?"

"हं !" तो तिरसटला.

मधूला हसू आलं, एकूण तो बोअर झाला होता. कुणाला असं बोअर करण्यातही मजा असते. मधूला त्याची आणखी रेवडी उडवावीशी वाटत होती. पण करणार काय ! ती अगदी एकटी होती. जोडीला कुणी हवं होतं. एखादी मैत्रीण तरी ! आणि

तेवढ्यात मधूचं लक्ष ट्रे घेऊन येणाऱ्या नीलांबरीकडे गेलं. नीलांबरी छान होती. एवढे सगळे ट्रे एका ट्रॉलीवर ठेवून ती काय ऐटीत चालत होती. मधू जागेवरून उठलीच व नीलांबरीच्या कानाशी लागून म्हणाली, " ए तो ढेरपोटचा बघ! सगळे आता जेवायचं म्हणून कपडे थोडे सैल करताहेत. न् हा! सगळा जामानिमा चढवून बसलाय. येडपटच वाटतोय मला."

नीलांबरी अगदी हळूच हसली. आणि त्याहीपेक्षा हळू आवाजात बोलली, " शू! असं काही बोलायचं नसतं. हे सगळे प्रवासी म्हणजे आमचे पाहुणे असतात."

" अय्या खरं? मग मीही पाहुणीच तुमची. ?"

" हो ना! म्हणून तर म्हणते आता जागेवर जाऊन बैस. मी मस्तपैकी जेवण देते तुला. तुझं जेवण होईपर्यंत दिल्ली येईल. मग तुझी माझी भेट पुन्हा कधी होईल कुणास ठाऊक! पण मला तू आवडलीस हं."

" मलाही तू आवडलीस. मी नाही तुला विसरणार. तू खरंच खूप छान आहेस. मला काय वाटलं सांगू? रागावणार नाहीस ना?

" छे ग! मुळीच रागावणार नाही."

" मला वाटलं, माझा दादा अमेरिकेत आहे ना, त्याला सांगावं तुझ्यासारखी वहिनी आण."

" वरं! वरं! तुझी वहिनी आली की मला बोलव हं! मी मुद्दाम येईन तुझ्या घरी."

नीलांबरी आणि मधू एवढ्या काय खुषीत बोलताहेत हे मधूच्या बाबांना कळेना. त्यांनी हातातलं पुस्तक मिटलं न् मधूच्या ममीला ते म्हणाले, " मधूकडे बघ! त्या एअर होस्टेसशी अगदी दोस्तीच करून टाकलीय तिनं. कमाल आहे बुवा!"

"आहेच तसली ती. कुठंही जाईल. कुणातही मिसळेल. कधी कधी खरं तर मला तिची भीती वाटते."

"कमालच करतेस तू! चांगली धीट, बोलकी, स्मार्ट आहे आपली छोकरी, याचा अभिमान वाटायचा का भीती?"

"ते तुम्हाला नाही कळणार. हल्लीचं जग कसं आहे. कधी कोण फसवील आणि काय होईल हे कळायचं नाही. त्यात ही अशी बोलघेवडी!"

"असू दे! असू दे! तू सदा त्या डिटेक्टिव्ह कादंबऱ्या वाचतेस न् मनाशी शंका कुशंका काढत बसतेस. जरा दुसरं काही चांगलं वाचावं."

मधूची ममी नाक उडवून काहीतरी उत्तर देणार होती तेवढ्यात मधू धावतच तिच्याजवळ आली न् म्हणाली, ए ममी, ती नीलांबरी कशी वाटते ग?"

"कोण नीलांबरी!"

"ती ग, ती एअर होस्टेस! बघ ना समोर. कशी स्मार्टली सगळ्यांशी बोलतेय. एकदम टॉप आहे की नाही! बाबा तुम्हाला आवडली का हो!"

"हो! फारच आवडली बुवा आपल्याला."

"मग द्या टाळी. ए ममी, दादाला मी आता पत्र टाकणार हं. काकाकडून त्यालाही तिकडेच घेणार बोलवून. नाहीतरी आता या महिन्यात तो येणारच आहे ना! मग तिकडे कुलगावलाच येऊ दे. तिथंच त्याचा साखरपुडा करायचा."

"साखरपुडा?" ममीनं नवलानं विचारलं.

"हो! मी नीलांबरीला तसं सांगूनही टाकलं. पण तिला कळलंच नाही. म्हणाली, 'तुझी वहिनी आली की मला बोलव.'

मग मीही काही बोलले नाही. तिला एकदमच चकीत करायचं. छान शोभेल किनई दादाची न् तिची जोडी ?"

यावर तिचे ममी अन् बाबा दोघंही मोठ्यानं हसली न् हसता हसताच एकदम थांबली.

ते दोघंच नाही, विमानातली सर्वच मंडळी एकदम जागच्या जागी गप्प झाली होती. कसला तरी वेगळाच आवाज झाला होता. विमान हिंदकळलं होतं, वाटलं होतं ते उलटं पालटं होतंय. मधूही घाबरली. ती पटकन् बाबांच्या मांडीवर त्यांना घट्ट धरून बसली. तिच्या ममीनंही बाबांचा दंड धरला होता.

मधूनं कावऱ्याबावऱ्या दृष्टीनं विमानातल्या माणसांच्याकडे पाहिलं. सारीच भांबावली होती. नीलांबरी ट्रॉली जागेवरच ठेवून आत पळाली होती. तिथं ती पायलटशी काहीतरी बोलली, आणि मग तिचा आवाज मधूला ऐकू आला. ती सांगत होती," आपापले पट्टे घट्ट आवळून बांधा. आपल्या विमानाला दुसऱ्या एका विमानाची थोडी धडक बसलीय. घाबरण्याचं कारण नाही. सारं व्यवस्थित होईल."

पण तिचं बोलणं पुरं होण्याआधीच विमान आणखी आणखी हिंदकळायला लागलं. प्रवासी गोंगाट करायला लागले. तो ढेर-पोटया तर आपल्या पोटावर हात देऊन रडायलाच लागला. मधूनं बाबांच्याकडे पाहिलं. त्यांच्या कपाळावर घाम आला होता. पण ते ओरडत नव्हते. त्यांनी शांतपणानं ममीच्या अंगाला पट्टा बांधला.मधूला जागेवर बसवून तिलाही बांधून टाकलं. मधू पहात होती, नीलांबरी चटचट धावत होती. प्रवाशांना पट्टे बांधायला मदत करीत होती. मधूचे बाबाही तिला मदत करायला उठले होते. मधूची ममी चक्क रडायला लागली होती. मधू ममीला म्हणत

होती, " रडू नकोस. लोक हसतील तुला. काही होणार नाही. तू आजीच्या देवाचं नाव घे. आजीनं शिकवलेलं गणपती स्तोत्र शिकवू तुला ? म्हण–प्रणम्यं शिरसा देवम्..."

पण ममीचं तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. मधूनं मग ममीवरचं लक्ष काढलं न् ती नीलांबरीकडे पहात राहिली. कशी शांत मनानं काम करीत होती. मुळीच घाबरली नव्हती. खरं तर मधूही घाबरली नव्हती. बाबांनी तिला बांधून ठेवलं होतं त्यामुळे तिचा इलाज नव्हता. नाहीतर खरं म्हणजे तिलाही नीलांबरीला मदत करावी असं वाटत होतं.

नंतरच्या थोड्याच वेळात विमान जास्तच गटांगळ्या खायला लागलं. आता मधूचे बाबाही जागेवर येऊन बसले. त्यांनी मधूचा पापा घेतला, तिच्या डोक्यावर थोपाटलं न् ते तोंडातल्या तोंडात पुटपुटले, " गॉड ब्लेस यू ! "

" बाबा! " मधूनं हाक मारली. इतका वेळ तिला मुळीच भीती वाटत नव्हती. पण बाबांनी असं केल्यावर तिला उगाचच काहीतरी वाटायला लागलं. तिनं ममीकडे वळून पाहिलं. ममी पार भेदरली होती. विमानात एकच गोंगाट उडाला होता. मधूनं त्या ढेरपोट्याकडे पाहिलं. तो आपलं पोट सावरीत होता. काही-तरी पुटपुटत होता. बहुधा देवाचं नाव घेत असावा.

विमानानं एक गचका दिला. आणि ते सरसर खाली निघालं. कसले तरी भयानक आवाज येत होते. विमानात तर एकच गोंधळ उडाला होता. खूप मोठ्ठा आवाज झाला न् विमानानं एक पलटी खाल्ली. मधूच्या कानठळ्या बसल्या. एकदम लखकन् असा मोठ्ठा उजेड पडला. त्या उजेडात मधूला एक डोंगर अगदी जवळ आल्यासारखा दिसला. त्यावरची झाडंही स्पष्ट दिसली.

मग मीही काही बोलले नाही. तिला एकदमच चकीत करायचं. छान शोभेल किनई दादाची न् तिची जोडी ?"

यावर तिचे ममी अन् बाबा दोघंही मोठ्यानं हसली न् हसता हसताच एकदम थांबली.

ते दोघंच नाही, विमानातली सर्वच मंडळी एकदम जागच्या जागी गप्प झाली होती. कसला तरी वेगळाच आवाज झाला होता. विमान हिंदकळलं होतं, वाटलं होतं ते उलटं पालटं होतंय. मधूही घाबरली. ती पटकन् बाबांच्या मांडीवर त्यांना घट्ट धरून बसली. तिच्या ममीनंही बाबांचा दंड धरला होता.

मधूनं कावऱ्याबावऱ्या दृष्टीनं विमानातल्या माणसांच्याकडे पाहिलं. सारीच भांबावली होती. नीलांबरी ट्रॉली जागेवरच ठेवून आत पळाली होती. तिथं ती पायलटशी काहीतरी बोलली, आणि मग तिचा आवाज मधूला ऐकू आला. ती सांगत होती," आपापले पट्टे घट्ट आवळून बांधा. आपल्या विमानाला दुसऱ्या एका विमानाची थोडी धडक बसलीय. घाबरण्याचं कारण नाही. सारं व्यवस्थित होईल."

पण तिचं बोलणं पुरं होण्याआधीच विमान आणखी आणखी हिंदकळायला लागलं. प्रवासी गोंगाट करायला लागले. तो ढेर-पोटचा तर आपल्या पोटावर हात देऊन रडायलाच लागला. मधूनं बाबांच्याकडे पाहिलं. त्यांच्या कपाळावर घाम आला होता. पण ते ओरडत नव्हते. त्यांनी शांतपणानं ममीच्या अंगाला पट्टा बांधला.मधूला जागेवर बसवून तिलाही बांधून टाकलं. मधू पहात होती, नीलांबरी चटचट धावत होती. प्रवाशांना पट्टे बांधायला मदत करीत होती. मधूचे बाबाही तिला मदत करायला उठले होते. मधूची ममी चक्क रडायला लागली होती. मधू ममीला म्हणत

होती," रडू नकोस. लोक हसतील तुला. काही होणार नाही. तू आजीच्या देवाचं नाव घे. आजीनं शिकवलेलं गणपती स्तोत्र शिकवू तुला ? म्हण–प्रणम्यं शिरसा देवम्..."

पण ममीचं तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. मधूनं मग ममीवरचं लक्ष काढलं न् ती नीलांबरीकडे पहात राहिली. कशी शांत मनानं काम करीत होती. मुळीच घाबरली नव्हती. खरं तर मधूही घाबरली नव्हती. बाबांनी तिला बांधून ठेवलं होतं त्यामुळे तिचा इलाज नव्हता. नाहीतर खरं म्हणजे तिलाही नीलांबरीला मदत करावी असं वाटत होतं.

नंतरच्या थोडयाच वेळात विमान जास्तच गटांगळ्या खायला लागलं. आता मधूचे बाबाही जागेवर येऊन बसले. त्यांनी मधूचा पापा घेतला, तिच्या डोक्यावर थोपाटलं न् ते तोंडातल्या तोंडात पुटपुटले, "गॉड ब्लेस यू ! "

"बाबा! " मधूनं हाक मारली. इतका वेळ तिला मुळीच भीती वाटत नव्हती. पण बाबांनी असं केल्यावर तिला उगाचच काहीतरी वाटायला लागलं. तिनं ममीकडे वळून पाहिलं. ममी पार भेदरली होती. विमानात एकच गोंगाट उडाला होता. मधूनं त्या ढेरपोटयाकडे पाहिलं. तो आपलं पोट सावरीत होता. काही-तरी पुटपुटत होता. बहुधा देवाचं नाव घेत असावा.

विमानानं एक गचका दिला. आणि ते सरसर खाली निघालं. कसले तरी भयानक आवाज येत होते. विमानात तर एकच गोंधळ उडाला होता. खूप मोठ्ठा आवाज झाला न् विमानानं एक पलटी खाल्ली. मधूच्या कानठळ्या बसल्या. एकदम लखकन् असा मोठ्ठा उजेड पडला. त्या उजेडात मधूला एक डोंगर अगदी जवळ आल्यासारखा दिसला. त्यावरची झाडंही स्पष्ट दिसली.

म्हणजे विमान खाली खाली चाललं होतं. मधूनं बाबांना काही-तरी सांगण्यासाठी तोंड उघडलं, पण पुन्हा तसाच तो भयंकर आवाज झाला. मधूच्या डोळयासमोर लखकन् वीज चमकल्याचा भास झाला. तिच्या बाबांचा हात तिच्या डोक्यावर टेकल्याचं तिला समजलं आणि मग एकदम सगळा काळोखच काळोख पसरला. मधूला कांहीच कळेना. विमान कुठंतरी निघालंय एवढंच तिला समजत होतं. तो ढेरपोटचा मोठमोठ्यानं ओरडत होता. सारे आवाजच आवाज आणि फक्त सभोवती पसरलेला गडद् काळोख. मधूनं त्या आवाजाच्या गोंगाटात नीलांबरीला मोठ्यानं हाक मारली, "नीलांबरी, ए नीलांबरी वहिनी––"

हाका मारून मारून मधू खूप दमली, न् तिचं तिला कळायच्या आत ती केव्हातरी झोपून गेली. आपण कधी झोपलो, किती वेळ झोपलो हे तिचं तिलाच कळलं नव्हतं -पण आता ती जागी झाली होती क्षणभर आपण कुठं आहोत हे तिला कळेना. मग हळूहळू तिला सारं आठवलं. ते विमान, ती नीलांबरी, आणि––! तिनं दचकून सभोवार पाहिलं. सगळीकडे जणू काही तिच्या काळ्या गंधाची बाटलीच उपडी झाली होती. समोरचं काहीच कळत नव्हतं. तिला भीती वाटली प्रथमच. पण ती भुतांची किंवा चोरांची नव्हती. अपघात झाला होता. अशा अपघाताच्या बातम्या तिनं कितीतरी वाचलेल्या होत्या. त्या साऱ्या तिला आठवल्या. 'मम्मी–बाबा' तिनं हाका मारल्या. तिला उत्तर मिळाल नाही. आता मात्र तिला रडू फुटलं. मघाशी नीलांबरीच्या नादात ती मम्मी-बाबांना विसरली होती. पण आता तिला त्यांचीच काळजी वाटत राहिली. तिनं उठण्याचा प्रयत्न केला. पण तिला नीटसं उठता येईना. मग तिच्या लक्षात आलं, आपल्याला त्यावेळी



बाबांनी पट्ट्यानं खुर्चीला बांधलं होतं. तिनं काळोखातच अंदाजानं चाचपडून पाहिलं. तिची पाठ अजूनही त्या खुर्चीच्या पाठीला बांधलेलीच होती. पट्टा सोडायचा तिनं प्रयत्न केला. पण ते तिला जमेना. ती कुठं होती याचा नीटसा अंदाजही लागेना. काय् करावं तिला कळत नव्हतं. काळोख तर कसा दाट काजळासारखा दिसत होता. कसलीच, कशाचीच चाहूल लागत नव्हती. ती इथं या काळोखाच्या दरीत अशी एकटीच दूर फेकली गेली होती काय ?

तिचे बाबा–ममी कुठं असतील ? आणि ते विमान ? ती बाकीची माणसं ?

नीलांबरी ? तो—तो शेजारचा ढेरपोटचा ? कुणाचा कसलाच आवाज कसा नाही ?

मधू पडल्या पडल्याच विचार करीत राहिली. तिनं पट्टा सुटतो का पाहिलं. आणि त्यात तिला यश आलं. तिला नवल वाटलं, हे असं कसं घडलं ? तिनं जे वाचलं होतं ते फार भयंकर होतं. खूपशी माणसं तर—! मधूच्या अंगावर काटा आला. तिला वाटलं, 'ममी ग' करून मोठा गळा काढावा. 'बाबा बाबा' म्हणून जोरजोरात हाका माराव्या. पण मग त्याचीही तिला भीती वाटली. न जाणो आपण ओरडलो आणि उत्तर नाही मिळालं तर ? नाही, नाही ! असं होता कामा नाही. होणार नाही. मी त्यावेळी ममीला आजीनं शिकवलेलं गणेश स्तोत्र सांगत होते. आणि आजी म्हणते, गणपती हा संकटं दूर करणारा देव आहे.

मधू आपल्या नेहमीच्या सवयीनं पुन्हा एका विचारातून दुसऱ्या विचारात शिरत होती. आणि असा विचार करता करताच पुन्हा तिला गुंगी आली. तिला झोप लागली.

मधू जागी झाली. अगदी टक्क जागी झाली. आता सारं स्पष्ट दिसत होतं. काळोखाची दरी उजेडाच्या डोंगराआड जणू लपून गेली होती. मधूनं आपले चुरचुरणारे डोळे उघडले. मान फिरवून चारी बाजूंना पाहिलं, ती एकटीच अशी इकडे कुठंतरी येऊन पडली होती, विमान कुठं होतं ? बाकीचे ते सारे लोक ? तिचे ममी–बाबा ?

आता उजेडात तिला आपला पट्टा नीट सोडता आला. रात्री काळोखातच तिनं तो सोडण्याचा कसाबसा प्रयत्न केला होता. आता पट्टा सुटला तशी ती उभी राहण्याचा प्रयत्न करायला

विषय किशोर क्र. ५५२

लागली. आणि तिच्या पायातून एक जोराची कळ आली. ती जोरानं ओरडली, " आई ग ! "

खूप लांबून कुणीतरी विचारावं तसा आवाज आला, " Who is there ? कोण आहे ?"

तो आवाजही कसा कण्हल्यासारखा वाटत होता. शब्द उच्चारतानाही त्या विचारणाऱ्या माणसाला त्रास होत असावा. कोण असेल ते ?

मधूनं पडल्या पडल्याच उत्तर दिलं, " मी मधू ! माधुरी गुप्ते ! आपण कोण ? "

" कोण मधू ? Thank God ! खरंच मधू ही देवाची कृपाच म्हणायची. तू वाचलीस. "

" हो ! वाचले, पण माझा– पाय फार दुखतोय हो ! मला उठता येत नाही. आपण कोण ? कुठं आहात ?"

" मधू—मधू मी नीलांबरी. मी इथं या खड्ड्यात पडले आहे. मला फारसं लागलं नसावं. पण अंगावर एक ओंडका पडलाय. तो हळूहळू दूर करते न् मग हा खड्डा चढून वर येते. तू घाबरू नकोस. मी येतेच हं तुझ्या मदतीला. "

नीलांबरी ! आपल्याला आवडलेली नीलांबरी. ती कुठंतरी जवळपास आहे. मधूला वरं वाटलं. तिनं जागेवरूनच ओरडून विचारलं, " नीलांबरी, माझे बाबा, माझी ममी कुठं असतील ग ! माझा तर पाय जरासुद्धा उचलता येत नाही मला. कशी ग शोधणार मी त्यांना ? असं कसं ग आपलं विमान ———! "

बोलता बोलता मधूला रडू कोसळलं. खरं तर ती रडणारी मुलगी नव्हती. पण यावेळी मात्र तिला आपोआप रडायला आलं.

तिचं रडणं तिकडे नीलांबरीला ऐकू गेलं. आता ती खूप मोठ्ठा आवाज काढून म्हणाली, " मधू, ए मधू रडू नकोस. देवानं आपल्याला वाचवलंय. दोघींना असं जवळ जवळ आणलंय. परमेश्वराचा यात काही तरी हेतू असेल. थोडा वेळ थांब. ओंडका आता दूर झालाय. मी वर चढते आहे. पण फार भुसभुशीत आहे ग जमीन. माझा पाय सारखा घसरतो आहे."

" नीलांबरी, नीलांबरीताई, सावकाश चढ ग; तुला काही लागलं नाही ना ?"

" नाही हं मधू ! थोडंसं खरचटलंय एवढंच. मी येतेच तुझ्याजवळ. घाबरू नकोस."

नीलांबरीच्या त्या शब्दांनीच मधूला खूप धीर आला. आपल्या पायाच्या वेदनाही क्षणभर ती विसरली. नीलांबरीची वाट पाहात राहिली. एकेक क्षण तिला खूप मोठा वाटत होता. सारखं वाटत होत, किती वेळ लावतेय ही नीलांबरी ? किती खोल असेल तो खड्डा ?

मधू असा विचार करीत असतानाच नीलांबरी हळूहळू तिच्याकडे येताना दिसली. विमानात फिरणारी, लालचुटुक ओठांची ही नीलांबरी? मधू तिच्याकडे नवलाने पाहात राहिली. तिचं तोंड कसंतरीच दिसत होतं. डोळे सुजले होते. नाकाच्या शेंड्यावरून रक्त ओघळत होतं. ओठ कसे जाडजाड वाटत होते. चेहराही कसा ओबडधोबड दिसत होता. मातीनं माखला होता. तिचं पातळही दोनचार ठिकाणी फाटलं होतं. तिच्याकडे पाहून मधूला आणखीनच उमाळा आला. तिनं जोरानं हाक मारली, "नीलांबरी –नीलूताई !"

नीलांबरी तिच्या जवळ येऊन बसली. मधूच्या चेहऱ्यावरून

हात फिरवीत राहिली. नीलांबरी असा हात फिरवीत असतानाच मधूनं एकदम तिचा हात घट्ट पकडला आणि ती रडत रडत म्हणाली, "नीलांबरी, मी–मी तुला ताई म्हणाले, म्हणून तू रागावली तर नाहीस ना ? सांग ना ग ! तू पण रडतेस नीलूताई ?"

"नाही ग ! मी रडत नाही. मला किनई तू ताई म्हणालीस ना म्हणून खूप आनंद झाला. मधू, इथं या अशा भलत्या ठिकाणी आता आपण दोघीच आहोत. एकमेकीला सोबत करू. बाकीच्या लोकांना शोधुन काढू. त्यांना मदत करायला हवी. नाही. का ?"

"हो ग नीलूताई, माझी मम्मी, माझे बाबा, सगळे कुठं असतील ग ? पण नीलूताई मी कशी ग शोधणार कुणाला ? हा बघ माझा पाय ! मला तो हलवतासुद्धा येत नाही. फार कळा येताहेत ग सारख्या."

नीलांबरीनं मधूच्या पायाकडे पाहिलं. खरोखरच तो खूप सुजला होता. नीलांबरीनं हळूहळू त्या पायावरून हात फिरवला. हात फिरवता फिरवता ती प्रत्येक जागी दाब देत होती. मधूला विचारीत होती, "दुखतंय ? इथं ? तिथं ! "

आणि असं विचारता विचारता नीलांबरीला समजलं, मधूच्या पायाचं हाड मोडलंय. आता ? इथं काही कुणी डॉक्टर लगेच मिळणार नव्हता. नीलांबरीला एअर–होस्टेस झाली तेव्हाच पुष्कळशा गोष्टी शिकाव्या लागल्या होत्या, ज्या खुर्चीसह मधू पडली होती, त्या खुर्चीच्या फळ्या नीलांबरीनं मोकळ्या केल्या. मधूच्या पायाला बांधल्या. इकडं-तिकडं फिरून झाडाच्या दोन लांब जाड काठ्या आणल्या. मधूच्या हाताला धरून तिनं मधूला उभी केली. त्या काठ्या तिच्या हातात दिल्या आणि म्हणाली,

" मधू, शाळेत कधी तू अशी दोन काठ्यांच्या मदतीने पळाली आहेस का ग ? आमच्या शाळेत अशा स्पर्धा असायच्या, मी खूप पळायची."

मधू हसली. म्हणाली, " नीलूताई, तू खूप हुशार आहेस हं. मी रडू नये, धीर धरून या काठ्यांच्या मदतीनं चालावं असं वाटतंय ना तुला ? ही बघ मी चालते."

असं म्हणून पायातून कळा येत असताही मधूनं चालून दाखवलं. नीलांबरीनं पटकन् तिचा पापा घेतला. व म्हणाली, " खरंच फार शहाणी आहे आमची मधुराणी. चल आपण दोघी जरा इकडे तिकडे फिरून शोध घेऊ."



नीलांबरी व मधू हळूहळूच चालत होत्या. कारण मधूला चालताना-खूप त्रास होत होता. त्या अशा चालत असताना मधूचं लक्ष एका बूटाकडे गेलं ती नीलांबरीला म्हणाली, " नीलूताई, तो बघ बूट. तो त्या ढेरपोट्याचाच आहे. मी ओळखलाय."

"खरं ? मधू तू इथंच थांब हं, मी बघून येते.

कदाचित ते गृहस्थही जवळपासच कुठंतरी असतील. त्यांनाही मदत केली पाहिजे आपण. खरं ना?"

असं म्हणून नीलांबरी त्या बूटाच्या दिशेनं गेली. मधुही कशी तरी त्या काठ्यांच्या आधारानं हळूहळू नीलांबरीच्या मागे गेली. नीलांबरीनं तो बूट उचलला, उलटा सुलटा केला आणि ती एकदम ओरडली "मधू मधू, हा...बूट हा बूट वेगळाच आहे. सोन्याचा आहे तो आतून.

"सोन्याचा?" मधूनं नवलानं विचारलं. ती कशीतरी लगबगीनं नीलांबरीजवळ गेली. तिनं तो बूट हातात घेतला. हात मोकळा करायला तिला एका झाडाच्या खोडाला टेकायला लागलं होतं. ती त्या खोडाला टेकून उभी होती. बूट बराच जड लागत होता. पण वरून तर तो नेहमीसारखाच चामड्याचा वाटत होता.

मधू नीलांबरीला म्हणाली, "तरीच वरं का ग नीलूताई विमानात माझा पाय या बुटावर पडला ना, तेव्हा मला कसं काहीतरी वेगळंच वाटलं. कमाल आहे नाही? बूट सोन्याचा. म्हणजे चिक्कार श्रीमंत असणार तो माणूस? बिच्चारा! कुठं असेल ग तो! त्याचं पोट तरी केवढं मोठं होतं! पडला तर उठताही येणार नाही बिचाऱ्याला."

मधू बडबडत होती आणि नीलांबरी मुकाट्यानं चोहीकडे पाहात फिरत होती. त्या एका बुटाखेरीज दुसरं काही फारसं तिला तिकडे मिळालं नाही. मधूही मग उगाचच काहीतरी उचलत होती. आपल्या फ्रॉकच्या खिशात कोंबत होती. त्यात काही रंगीबेरंगी खडे होते. रेशमी धागे होते. तुटके तुटके. पण छान मऊमऊ होते.

दोघी हळूहळू दुसऱ्या बाजूला आल्या. तिकडे तर काहीच

नव्हतं. एक लहानशी नदी. छोटी टेकडी न् दोनचार झोपड्या. कुणाच्या होत्या कुणास ठाऊक ! पण नीलांबरी म्हणाली, "मधू आपण त्या झोपडीत जाऊ. मी तुला तिथं ठेवते, तुला काही फार चालवणार नाही. मी मात्र शोध घ्यायला जाते. आत्तापर्यंत मदत आलीही असेल."

"पण कुणाला कसं कळणार ग विमान पडल्याचं ?"

"विमान पडताना आवाज झाला नाही का ? तो ऐकून खरं तर रात्रीच आजूबाजूचे लोक धावले असतील. आणि तू कानाला तो हेडफोन लावला होतास ना, त्या हेडफोन लावलेल्या कॅप्टननं खाली संदेशही दिला असेल बघ विमान पडता पडता. काही का असेना, मला आसपास फिरून चौकशी केली पाहिजे. एअर-होस्टेस म्हणून मी त्या विमानात होते, माझं कर्तव्य आहे सगळं पाहायचं."

असं म्हणून नीलांबरीनं मधूला त्या झोपडीत पोचवलं. त्या मंडळींना मधूची काळजी घ्यायला सांगितलं. आणि ती निघून गेली. जाता जाता तिनं मधूजवळ तो बूट दिला आणि म्हणाली, "मधू तो बूट नीट संभाळ, आपल्याला त्याचा फार उपयोग होणार आहे पुढे."

नीलांबरी गेली न् मधू त्या झोपडीत एका बाजूला बसून राहिली. हे लोक कसे वेगळेच दिसत होते. विमान पडलं होतं दिल्ली यायच्या अगोदर. म्हणजे हे लोक आपलेच ? यांना हिंदी यायला हवं. आपली राष्ट्रभाषा आहे ती. मधू एका जागी बसून त्यांच्याकडे पहात होती. सकाळपासून तिच्या पोटात काहीच नव्हतं. घरून निघताना ती जे जेवली होती तेवढंच. तिला आता सपाटून भूक लागली होती. झोपडीत एका बाजूला चूल पेटलेली

होती. एक बाई भराभर रोटी. भाजत होती. एकामागून एक ! पुढच्यातल्या थाळीत चवडच्या चवड उभी होती रोटयांची. कधी नाही ते मधूला वाटलं, त्या बाईला म्हणावं, 'चाचीजी, मुझे एक रोटी दे दो ! मैं कलसे भूखी हूं !'

पण तिनं मन आवरलं. कुणाकडेही काहीही मागायचं नाही असं आजीनं तिला शिकवलं होतं. 'आजी ! आजी ग !'

मधूला एकदम उमाळा आला. आवरावं म्हटलं तरी तिला आपलं रडू आवरेना. आपलं डोकं गुडघ्यात घालून ती रडत राहिली. मोडक्या पायातून कळा येतच होत्या.

ती अशी रडत असतानाच कुणीतरी तिच्या पाठीवरून हात फिरवला. प्रेमानं हाक मारली, "बेटी, बेटी रोती क्यूं ? चूप, चूप ? ले, ये दूध पि ले."

मधूनं मान वर करून पाहिलं. साधारण तिच्या आजीच्याच वयाची ही बाई होती. तिला मायेनं थोपटत होती. दूध पी म्हणून सांगत होती.

मधूनं पटकन् ते मोठा ग्लासभर दूध प्यायलं. दूध खूपच छान होतं. दूध प्यायली न् मधूला एकदम झोपच यायला लागली. मधून त्या आजीला विचारलं," यात काय होतं ? मला झोप का यायला लागली हो ? '

"हो बेटी ! यात झोपेचं औषध आहे. तुझा पाय मोडलाय. तुझ्या पायाचं हाड हे तुझे चाचा नीट वसवतील. दोन दिवसांत तू धावायला लागशील."

दोन दिवस ? मग नीलूताई ? का ती मला इथंच सोडून गेली ? ममी ? बाबा ? कुणीच मला भेटणार नाही ? मला इथून घर कसं सापडणार ? काकांना विमान पडल्याचं कळलं असेल

का ? काकूला किती वाईट वाटेल ! काकूची सगळी तयारी फुकट जाणार. राजाशी आपण दोस्ती करणार होतो. पण आता काय त्याचं ? सगळेच बेत वाया गेले.

विचार करता करताच कधीतरी मधूला गाढ झोप लागली. अगदी गाढ. ती जागी झाली तेव्हा ती त्या झोपडीत नव्हती. एका वेगळ्याच ठिकाणी होती. आणि तिच्या जवळ बसली होती तिची काकू. मधूनं पुन्हा पुन्हा आपल्या डोळ्यांची उघडमीट केली. मग स्वतःला चिमटाही घेतला. सारं खरं आहे याची खात्री पटल्यावरच तिनं हाक मारली, " काकू ! काकू तू कशी आलीस ? ममी–बाबा कुठं आहेत ?"

काकूनं डोळ्यात जमलेलं पाणी पुसलं, मग हलकेच मधूचा पापा घेतला. म्हणाली, " मधू केवळ देवाची कृपा म्हणूनच सारी वाचली. नाहीतर—!"

मधूनं आनंदानं काकूचा हात घट्ट दाबला. " खरं ? काकू, खरंच सगळी वाचली ? ममी–बाबा—"

" हो ग ! अगदी सगळी वाचली बरं. विमानाचा पायलट-सुद्धा वाचलाय बरं. लागलंय खूप त्याला. पण वाचला हे का थोडं झालं !"

" मग ममी-बाबा कुठं आहेत ? '

" त्यांना दवाखान्यात ठेवलंय."

" आणि मी ? मी कुठं आहे काकू ?"

" तू इथं माझ्याजवळ आहेस."

" म्हणजे -म्हणजे मी कुलगावला आहे ?"

" नाही दिल्लीला आहेस. इथंही आपलं एक घर आहे बेटा, तुझ्या काकांनी घेऊन ठेवलंय. विमानाच्या अपघाताचं कळलं न्

आम्ही धावत आलो. तुझे ममी-बाबा इथल्याच दवाखान्यात आहेत. पण तुला मी घरी आणलंय."

"पण काकू–ती, ती झोपडी ती माणसं ? आणि नीलूताई ? ती मला शोधत असेल ना तिकडे."

"शोधू दे ! तू आता स्वस्थ पड बघू ! मग सगळं सांगेन मी तुला, एकदम खूप बोलू नकोस."

काकूनं असं सांगितलं म्हणून मग मधू गप्प राहिली. पण मनाशी मात्र विचार करीत बसली. ममी-बाबा दवाखान्यात आहेत, म्हणजे त्यांना नक्कीच खूपसं लागलं असणार पण आता ते बरे होतील. मी त्यांना भेटायला जाईन. पण कशी जाऊ ? माझा पाय —?

आणि पायाची आठवण होताच मधूला त्या बुटाची आठवण झाली. बाप रे ! नीलूताईनं तो बूट संभाळून ठेवायला सांगितलं होतं. कुठं आहे तो बूट ? त्या झोपडीतच राहिला वाटतं ? कुठं असेल तो झोपडी ? आपल्याला कसली सापडणार आहे ती झोपडी आता ? शोधायचं म्हटलं तरी हा पाय मोडून पडलाय. काय करायचं आता ?

काकूनं आपल्याला इथं आणलंय. कुठून ? कसं ? का त्या झोपडीतूनच घेऊन आली ती आपल्याला ? तसं असेल तर काकूला माहीत असेल ती झोपडी. तिलाच विचारावं.

मधूनं जोरात हाक मारली, "काकू."

खरं तर काकू जवळच होती. ती पटकन् मधूच्या जवळ आली. काकूच्या मागोमाग काकूचा राजाही आला.

ओ हो ! इतका छान आहे हा राजा. त्याच्याशी दोस्ती केलीच पाहिजे. पण केवढा मोठा आहे हा !

राजा अगदी जवळ आला. त्यानं मधूचा पाय हुंगला. मधूनं काकूला विचारलं, "काकू तो चावणार नाही ना ग ?"

"छे ग ! तुझ्या पायाला प्लास्टर घातलंय ना, ते पाहातोय तो. त्याला ते सगळं नवीन वाटतंय ना, म्हणून."

प्लास्टर ? मधूनं पाय वर उचलून पाहिलं. खरंच तिच्या पावलापासून वर अर्ध्या पोटरीपर्यंत पांढरं प्लास्टर घातलेलं होतं. जणू काही पांढरा बूटच ! पुन्हा तिला त्या बुटाची आठवण झाली. तिनं काकूला विचारलं, "काकू, तू मला त्या झोपडीतून इथं आणलंस, हो ना ?

"झोपडी ? नाही ग !"

"मग ? अग मी झोपडीत होते. तिथल्या एका आजीनं मला दूध प्यायला दिलं न् मी झोपले. जागी झाले तर तू जवळ. काकू, नीलूताईनं माझ्याजवळ विमानात माझ्या शेजारी बसलेल्या ढेर-पोट्याचा बूट दिला होता. नीट जपून ठेव म्हणाली होती."

"जाऊ दे ग ? बुटाचं काय एवढं महत्त्व. आधी तू आम्हाला मिळालीस हेच केवढं नशीब ! बूट काय एक गेला तर दुसरा घेईल तो माणूस !"

"नाही काकू नाही ! तसं नाही ते. तो बूट साधा नव्हता. सोन्याचा होता."

"कसला सोन्याचा ? अग सोनेरी रंगाचा असेल. सोन्याचा कधी बूट असतो का वेडे ?"

"आता कसं सांगू काकू तुला. सोनेरी रंगाचा नव्हता. आपल्या बुटासारखाच वरून चामड्याचा दिसत होता. पण आतून सोनं होतं असं म्हणत होती नीलूताई. म्हणत होती, याचा आपल्याला खूप उपयोग होईल."

काकू सारं ऐकत होती. हे काहीतरी वेगळं होतं. काकूनं मधूला विचारलं, " मधू तुला ती झोपडी ओळखता येईल ? तिथली माणसं ?"

" येईल. सगळं सगळं ओळखता येईल. पण वाट कुठं माहीत आहे. नीलूताई भेटली तर तिला कदाचित् सापडेल ती वाट. ती हुषार आहे. एअरहोस्टेस आहे. म्हणून तर ती मला त्या झोपडीत ठेवून दुसऱ्या माणसांच्या शोधासाठी गेली. काकू तिलाही लागलं होतं ग खूप !"

काकू थोडावेळ गप्प राहिली. मग मधूला थोपटत म्हणाली, " मधू, तुझी नीलूताई जिवंत आहे हे कुणाला माहीतच नाही. सर्वांना वाटतंय ती कुठंतरी दूर जाऊन पडली. दोन दिवस तिचा शोध केला पण ती सापडली नाही."

"पण काकू ती जिवंत आहे. आम्ही दोघी एकदमच त्या झोपडीत गेलो. तिनंच माझ्या पायाला खुर्चीची फळी फोडून बांधली. मला झाडाची जाड फांदी काठी म्हणून वापरायला दिली. चालायला शिकवलं. काकू, मग मी कुठं सापडले ?"

" तू ? काय सांगू मधू तुला, त्या विमानातल्या मंडळींचा शोध घेत घेत सारे फिरत होते. मुंबईहून मोठमोठे अधिकारी आले होते. सर्व सापडले पण तू, तुझी नीलूताई आणि एक कुरेशी नावाचे गृहस्थ, तिघांचा काही शोध लागत नव्हता. तुझे काका तर वेड्यासारखे तुझ्या शोधासाठी फिरत होते आणि मग एका खड्ड्यात तू त्यांना दिसलीस. तुझ्या पायाला खूपसा पालापाचोळा बांधलेला होता. अंगावरही पानं टाकून तुला झाकली होती. पण तुझा एक हात खड्ड्याच्या बाहेर आला होता. मला वाटतं—घाबरू नकोस, पण मला वाटतं एखाद्या कोल्ह्यानं तो बाहेर काढला

असेल, पण मग माणसांची चाहूल लागल्यावर तो पळाला असावा. नशीब आमचं म्हणून सापडलीस. दोन दिवस तू शुद्धीवर आली नाहीस."

काकू बोलत होती, पण मधू दुसराच विचार करीत होती. एखाद्या रहस्यकथेत वाचावं असं खुद्द तिच्याच बाबतीत घडलं होतं. म्हणजे ती झोपडीतली माणसं खरंच तिला वाटलं तशी वेगळीच होती. त्यांनीच तिला त्या खड्ड्यात टाकून दिलं असणार. पण का ? आपल्या आजीच्याच वयाची ती आजी ! तीही एवढी दुष्ट असेल ? तिनंच तर आपल्याला दूध पाजलं. ते दूध प्यायलं आणि आपण झोपून गेलो. दोन दिवस ! काय काय झालं असेल या दोन दिवसांत ? आपली नीलूताई कुठं असेल ? किती छान आहे ती ! तिला आपण वहिनी करून घेणार होतो. पण तीच कुठं हरवली. का तिलाही कुणी आपल्यासारखंच काही केलं असेल ? कुरेशी कोण ? त्याचा सीट नंबर कळला तर ? आठवताहेत का का सारी नावं आपल्याला ? आपण एकदा उगाच चाळा म्हणून आपल्या आजूबाजूच्या सीटची नावं वाचली होती आठवतील, आठवतील.

मधू मग नावं आठवण्याचा प्रयत्न करीत राहिली. काकूला वाटलं मधूला झोप लागली. तिनं राजाला सांगितलं, "राजा, ही आपली मधू ! हिला सोडायचं नाही हं ! नीट जप तिला. तुझ्या-सारखीच शहाणी आहे ती."

डोळे मिटलेली मधू सारं ऐकत होती. काकूच्या बोलण्यावर राजानं 'कूं कूं' आवाज काढलेला मधून ऐकला. राजा जणू काकूला सांगत होता, "तू मुळीच काळजी करू नकोस. मी हिला सोडून कुठंच जाणार नाही."

सवयीप्रमाणे पुन्हा मधू एका विचारातून दुसऱ्या विचारात गुंतली. राजाला घेऊन नीलूताईचा शोध करायला जावं का? पण कुठं जायचं? कसं जायचं? आपला तर पाय दुखतोय-ह्रां मेला पाय भलत्याच वेळी मोडला.

मधूनं रागारागानं अंगावरची रजई लाथाडली. आपला पाय दोनचार वेळा गादीवर आपटला. आणि तिच्या लक्षात आलं, आपला पाय दुखत नाही. 'Thank you गणपतिबाप्पा. तू माझे मम्मी-बाबा वाचवलेस, माझा पायही नीट झालेला दिसतोय. बाप्पा आता तेवढी नीलूताई सापडू दे बाबा. तुला आजीकडून एकवीस मोदकांचा नैवेद्य दाखवीन. आवडतात ना तुला मोदक? या राजालाही मस्तपैकी बनपाव घालीन नीलुताई सापडली तर. कुठं असेल बरं ती आणि तो कुरेशी कोण? कुठल्या नंबरचा?"

आणि मधू एकदम उठून बसली. राजा तिच्याकडेच पाहात होता. मधूनं राजाचे कान पकडले, त्याच्या नाकावर आपला गाल घासला, आणि म्हणाली, "राजा, मी आता चालून पाहणार आहे. चालता आलं तर आपण नीलूताईला शोधायला जायचं बरं का! अरे कुरेशी कुठला, तो तोच! माझ्या शेजारचा लठ्ठंभारती. तो सोन्याच्या बूट त्याचाच. आता सगळं ध्यानात आलंय माझ्या."

राजाला तिचं बोलणं समजलं किनई कुणास ठाऊक! पण त्यानं आपली शेपटी मात्र जोरजोरात हालवली. मधू ते पाहून खुष झाली. राजाच्या पाठीवर थाप मारून म्हणाली, "शाब्बास! तू खरंच हुशार आहेस रे. अगदी त्या पोलिसांच्या कुत्र्यासारखा. थांब हं राजा, मी आता खाली उतरते. उभी राहते ना! राजा, अरे उभं राहता आलं की रे!"

मधू उभी राहिली, आणि तिनं दोनचार पावलं टाकली. सुरुवातीला पायात थोडी कळ आली. प्लास्टर घातलेला पायही जड वाटला. पण ती तशीच त्या खोलीत चालत राहिली. एक, दोन चांगल्या दहा फेऱ्या तिनं त्या मोठ्या खोलीत मारल्या. राजा शेपटी हलवीत हलवीत तिच्यामागून चालत होता.

मधू मग थांबली. राजाला म्हणाली, "राजा चल, मला काकू-कडे घेऊन चल, मला या घरातलं काहीच माहीत नाही रे. दाखवतोस तुझं हे घर ?"

आणि काय आश्चर्य ! राजा डुलत डुलत खोलीच्या बाहेर पडला. त्यानं मधूला या खोलीतून त्या खोलीत नेल न् शेवटी काकू अगदी मागे सैपाकघरात काहीतरी करीत होती, तिकडे तो तिला घेऊन गेला.

मधूनं काकू दिसताच दुरूनच हाक मारली, "काकू"

"अगबाई मधू तू ! अग चालत का आलीस इथपर्यंत ! पाय नाही का दुखला ?"

"अं हं ! अगदी बरा झालाय पाय. काकू खूप भूक लागलीय ग ! जेवायला वाढतेस ! "

"झालंच हं मधू ! तुझ्या ममी-बाबांचा डबा भरते आणि तुला जेवायला वाढते."

"डबा कोण नेणार काकू !"

"ड्रायव्हर नेईल."

"मी जाऊ ? जाते की ग ! ममी-बाबांना केव्हा पाहीन असं झालंय मला. ए प्लीज, हो म्हण की ग !"

"बरं जा ! पण लौकर ये हो. फार बसू नकोस तिकडे बडबड करीत. मला इथं मुळीच करमत नाही बघ."

मधू भराभर जेवली. मधूबरोबरच काकूनं राजालाही त्याची रोटी दुधात कालवून घातली. काकूचं लक्ष नाही असं पाहून मधू हळूच राजाच्या कानात म्हणाली, ‘ राजा पोटभर जेवून घे. आपल्याला नीलूताईला शोधायला जायचं आहे बरं का ! एकदा इथनं बाहेर तर पडू दे ! ”

राजानं मधूकडे पाहून आपले गोलगोल डोळे एकदा मिटले. उघडले, आणि त्यानं भराभर आपली थाळी मोकळी केली. ते पाहून काकू म्हणाली, “ वा ! आज राजा अगदी शहाणा झालाय. सगळं चाटून पुसून खाल्लंय. आणखी हवी का रे ! ”

“ घाल ! घाल काकू त्याला. खूप भूक लागलेली दिसते त्याला. खा रे राजा. लाजू नकोस. ”

राजाने मधूकडे पाहून कान ताठ केले. काकू रोटी घालता घालता म्हणाली, “ वा ! वरीच दोस्ती झालेली दिसतेय तुझी राजाशी ! आपला राजा फार हुशार आहे हं मधू ! अग इथले एक पोलीस अधिकारी सारखे मागताहेत त्याला. ”

“ नाही हं काकू ! आपला राजा कुणालाच द्यायचा नाही. तो माझा आहे. हो किनई रे राजा ? ”

राजानं आपली शेपटी जोरजोरात हालवली. एकदम पटलं होतं त्याला मधूचं ते बोलणं !

मधू गाडीत बसली तसा उडी मारून राजाही पटकन् तिच्या शेजारी जाऊन बसला. ड्रायव्हर काकूला म्हणाला, “ बाईसाहेब, हा राजा नको. हॉस्पिटलमध्ये अडवतील त्याला. उगाच कटकट नको. ”

“ असू दे ग काकू ! मी सांगेन तिथल्या लोकांना आपला राजा किती शाहाणा आहे ते. ”

"पण-पण बाईसाहेब तो फार त्रास देतो मला-"

"नाही द्यायचा. मी सांभाळीन त्याला. सांग की ग काकू. चला हो तुम्ही ड्रायव्हर!"

मधूपुढे ड्रायव्हरचं काही चाललं नाही. रस्त्यात मधू सारखी आळीपाळीनं ड्रायव्हरशी आणि राजाशी बोलत होती. ड्रायव्हरला नाव विचारलं तेवढंच त्यानं सांगितलं. "फ्रान्सिस."

मग मधूनं त्याला फ्रान्सिसकाका म्हणण्याला सुरुवात केली. घरी कोण कोण आहे, कुठं राहतात, एक ना दोन! सारखी वटवट चालली होती. पण फ्रान्सिस काही फारसं बोलत नव्हता. शेवटी मधूनं विचारलं, "का हो, तुम्हाला बोलायला आवडत नाही का हो? आमच्या या राजाला बोलता आलं असतं ना, तर तो आख्खा दिवस माझ्याशी गप्पा करीत बसला असता. नाही का रे राजा!"

राजानं एकच कान हालवला. त्यालाही बोलायचा कंटाळा आला असावा. मधू बोलत होती, आणि राजा खिडकीतून डोकं काढून बाहेरचा रस्ता पाहत होता.

ममी-बाबा खूपच लांबच्या दवाखान्यात होती. त्यांची खोली मात्र रस्त्यापासून जवळच होती. खिडकीतून सगळं दिसायचं. आपली गाडी दिसताच ममी-बाबांच्याजवळ बसलेले काका लगेच बाहेर आले. मग राजाला कुणी अडवण्याचा प्रश्नच आला नाही. मधू काकांचा हात धरून खोलीत गेली. ममी-बाबांना पाहून तिला खूप आनंद झाला. ममीच्या पाठीला प्लास्टर घातलं होतं. तिला ग्लुकोज् सलाईन चालू होतं. पण ती बरी होती. मधूशी बोलली. मधूच्या पाठीवरून हात फिरवला. म्हणाली, "जपून राहा. पायावर

उगाच जास्त भार देऊ नकोस. वांडपणा करू नकोस. तुझी आजी येईलच दोन दिवसांत. त्या आल्या की माझी निम्मी काळजी दूर झाली."

ममीचं हे बोलणं नेहमीचंच होतं. तिला आपली सदा सगळ्यांची काळजीच वाटत असते. मधूच्या मनात आलं, आता जर का आपण आपला बेत ममीला सांगितला तर? आई ग! विचारी घाबरूनच जाईल. आपल्याला इथून हलूच देणार नाही.

मधू ममीजवळ बसली होती, आणि बाबांच्याकडे पहात होती. बाबांचा आख्खा पाय प्लास्टरमध्ये होता. त्यांच्या हनुवटीलाही खूप मोठं बँडेज बांधलेलं होतं. मधू बाबांच्याकडे पाहात होती आणि बाबा मधूकडे. एवढ्या वेळात बाबा एक शब्दही बोलले नव्हते. मधू ममीजवळून पटकन् उठली न् बाबांच्याकडे गेली. बाबांच्या गळ्यात हलकेच हात टाकून म्हणाली, "बाबा, बाबा तुम्हाला बोलता येत नाही? Oh! How pity!"

आणि मग काकांच्याकडे पाहून तिनं अगदी रडवेली होऊन विचारलं, "काका, बाबांना पुन्हा पहिल्यासारखं बोलता येईल ना हो?"

"येईल बरं! तू बिलकुल काळजी करू नकोस. अग देवाची केवढी कृपा आहे आपल्यावर! भलतंच कांही झालं असतं तर?"

"नाहीच होणार काका. मी गणपती स्तोत्र म्हणत होते तेव्हा. मम्मीलासुद्धा म्हणायला सांगितलं होतं. हो किनई ग ममी?"

आणि मग ती बाबांच्या कानाशी तोंड नेऊन म्हणाली, "बाबा आपली नीलूताई–ती हो आपली एअरहोस्टेस–ती जिवंत आहे. आम्ही दोघी एकमेकीशी बोललो देखील. पण ती म्हणे हरवलीय. बाबा मी तिला शोधून काढणार."

मधूच्या बाबांना नीटसं हसताही येत नव्हतं. तरी पण त्यांनी मधूच्या पाठीवर थोपटलं. तिच्या पायाकडे बोट दाखवलं. मधू आता मात्र भान विसरून हसली न् म्हणाली, "मारो गोली! या पायानंच मी चालणार."

न कळत मधूचा आवाज मोठा झाला होता. काकांनी विचारलं, "कसला बेत आहे मधू? कुठं जायचं आहे तुला?"

"कुठं नाही काका! ते आमच खास गुपित आहे. या राजाला आणि आता बाबांना, फक्त दोघांनाच ते माहीत आहे. बाकी कुण्णा-कुण्णाला आम्ही सांगणार नाही."

"हे मात्र छान आहे हं मधू तुझं. कारण तुला माहीत आहे, त्या दोघांनाही बोलता येत नाही. म्हणजे तुझं गुपित फुटायलाच नको." ममी म्हणाली.

"पण वहिनी आणखी दोनतीन दिवसांत हिच्या बाबांना बोलता येणार आहे, मग कळेलच की आपल्याला."

"हो—पण काका तोपर्यंत माझं कामही झालं असेल, मग कळलं तरी कुछ हरकत नाही."

"वरं बरं! आता जा घरी. या फ्रान्सिसला आणखी कुठं जायचं आहे, कालपासून तो दोन तीन तास रजा घेतो, पळ!"

काकांनी अशी आज्ञाच केली. मग मधू उठली. तिनं ममीचा आणि बाबांचा आपण होऊन एकेक पापा घेतला न् ती राजाला म्हणाली, " चल रे. "

काकांनीही राजाच्या पाठीवर थाप मारली. म्हणाले, " राजोबा आपल्या मधूला सोडू नका हं. ती नवी आहे इथं. "

मधू आणि राजा बाहेर आले तेव्हा फ्रान्सिस एका झाडाखाली कुणाशी तरी बोलत बसला होता. राजाला काय झालं कुणास ठाऊक, तो एकदम गुरगुरला. ते गुरगुरणं ऐकून तो दुसरा माणूस फ्रान्सिसला म्हणाला, " साला, या कुत्र्याला एक दिवस गोळीच घालतो मी. "

मधूनं ते ऐकलं न् ती चिडून त्या माणसाला म्हणाली, " काहो का, आमच्या राजाला काय म्हणून मारणार तुम्ही. सांगू का काकांना माझ्या ? "

पण मधूचं बोलणं पुरं होण्याआधीच तो माणूस पाठ फिरवून निघून गेला. जाता जाता तो फ्रान्सिसला काहीतरी सांगून गेला. काय ते मात्र मधूला ऐकू आलं नाही.

फ्रान्सिस मधूजवळ आला, त्यानं तिला मोठ्या अदबीनं सॅल्यूट केला. राजाच्या पुढ्यात एक कुरकुरीत बिस्किट घातलं मधू नवलानं त्याच्या त्या साऱ्या वागण्याकडे पहात राहिली. मघाशी तो धड तिच्याशी बोलायला तयार नव्हता. त्याला राजाही नको होता. आणि आता एकदम कसली जादू झाली ?

फ्रान्सिसनं टाकलेलं बिस्किट राजानं नुसतं हुंगलं. खाल्लं नाही, मधूनं ते पाहिलं न् राजाला एक टप्पल मारून ती म्हणाली, " का रे राजा, आपल्या फ्रान्सिसकाकांनी घातलेलं बिकिस्ट खात नाहीस. खुळाच आहेस, "

मधू एवढं बोलूनच नुसती थांबली नाही. तिनं ते बिस्किट आपल्या कुडत्याच्या खिशात ठेवून दिलं. फान्सिस ते पाहून मोठ्या नम्रपणानं म्हणाला, "ताईसाहेब कशाला ठेवता ते बिस्किट? द्या टाकून."

मधूनं हो म्हटलं, पण तिला काय वाटलं कुणास ठाऊक तिनं ते तसंच खिशात राहू दिलं. राजा आधीच मोटारीत जाऊन बसला होता, फ्रान्सिसनं गाडी चालू केली. मधू डोकं बाहेर काढून पहात होती. ती राजाला म्हणाली, "का रे, असा अगदी रुसून बसला आहेस? बघ ना रस्ता कसा छान आहे."

"ताईसाहेब–आपण जरा वेगळ्या वाटेनं जाऊ या का? माझा एक मित्र राहतो त्या बाजूला. खूप दिवसात भेटला नाही."

"जाऊ या की! बरंच झालं· मला जरा नवीन भाग पहायला मिळेल."

"पण ताईसाहेब, आपण अशी वाट सोडून दुसरीकडे गेलो होतो, हे तुम्ही घरात नका सांगू. बाईसाहेब रागवतील मला. पण काय आहे ताईसाहेब, आता इथून थोडं आंत गेलं की त्याचं घर आहे. आम्हा गरिबांना एवढ्या लांब रिक्षानं येणं काय परवडतंय? आज जरा सवड आहे. तुमचा स्वभावसुद्धा फार मायाळू वाटला, म्हणून विचारलं."

"काही हरकत नाही फ्रान्सिसकाका. मी नाही सांगणार काकूला. चला तुम्ही. मात्र फार वेळ नका लावू. नाहीतर काकू उगाच काळजी करीत बसेल."

फ्रान्सिसनं गाडीचा वेग वाढवला. मधूला खूप मजा वाटली. तिचे बाबा कधी इतक्या जोरानं गाडी चालवीत नव्हते. ममी तर

मुलखाची भित्री. ती ड्रायव्हिंग करीत असली की मधूला तर फार कंटाळा यायचा. पण आता फ्रान्सिस तर एकदम मस्तच ड्रायव्हिंग करीत होता. मधूचे केस सारखे उडत होते. मधूनं खिशातून स्कार्फ काढला न् डोक्याला बांधला. गाडीचा वेग वाढला तसा इतका वेळ पायात डोकं घालून बसलेला राजा मान ताठ करून बसला. मधूच्या स्कार्फचं टोक त्यानं उगाचच तोंडात धरून ओढलं, मधूला गंमत वाटली.

गाडी सुसाट पळत होती. आता मधूला बाहेरचं नीटसं काहीच दिसत नव्हतं. रस्ता सोडून गाडी आडवाटेला लागली. काहीशी जंगलात शिरली. गाडी धावत होती, मधू मधूनच बाहेरचं काही पाहण्याचा प्रयत्न करीत होती. आणि असं पाहता पाहता मधू एकदम ओरडली, " अय्या ! ताई. "

फ्रान्सिसनं एकदा मागं वळून पाहिलं न् गाडीला आणखी वेग दिला. मधू फ्रान्सिसला म्हणाली, " फ्रान्सिसकाका गाडी इथं थोडी थांबवा ना. अहो मला त्या झाडाशी माझ्या नीलूताईसारखं कुणीतरी दिसलं. थांबवा ना प्लीज ?"

पण फ्रान्सिसला जणू तिचं बोलणं ऐकूच गेलं नव्हतं. त्यानं गाडीचा वेग कणभरसुद्धा कमी केला नव्हता. त्यानं मागे वळूनही पाहिलं नाही.

फ्रान्सिसनं गाडी एका लहानशा खोपटापाशी आणून उभी केली. मधूला उगाचच ती जागा कुठेतरी पाहिल्यासारखी वाटली. ती इकडे तिकडे पहात होती. तेवढ्यात कुणीतरी पटकन् तिच्या बाजूचं दार उघडलं आणि तिला उचलून घेतलं, राजानं त्या माणसाच्या अंगावर एकदम झेप घेतली. त्या उचलणाऱ्या माणसाला राजानं खाली पाडलं. त्या माणसाचे हात सैल पडले,

तशी मधू पटकन् उठून उभी राहिली. राजा अजूनही त्या माणसाच्या अंगावर तुटून पडला होता.

मधू खरं तर घाबरली होती. पण तरीही तिनं जोरानं हाक मारली, " फ्रान्सिसकाका."

आणि तिला दिसलं, आणखी कुणीतरी माणूस फ्रान्सिसशी जोरजोरात बोलत होता. त्या दोघांचा काहीतरी वाद चालला होता.

मधूनं पुन्हा हाक मारली, " फ्रान्सिस."

आणि फ्रान्सिस तिच्या बाजूनं धावत आला, तिला म्हणाला, " चल पोरी. एवढ्याशा पैशासाठी मी एवढा खटाटोप केला काय ? कबूल केले दोन हजार न् हातात देतात पाचशे."

पण आता त्या दुसऱ्यानं फ्रान्सिसला धरला होता. मधूनं राजाला हाक मारली, पण ऐनवेळी राजा कुठं दिसतच नव्हता. फ्रान्सिसला धरल्यानंतर त्या माणसांनी गाडीची किल्ली काढून दूर फेकली. आता फ्रान्सिसची सुटका झाली तरी आपल्याला पळता येणार नाही हे मधूनं ओळखलं.

मधू तशीच जागेला खिळून उभी राहिली. तिनं इकडे तिकडे पाहिलं राजा कुठंच दिसत नव्हता. थोड्या वेळानं त्या ठिकाणी आणखी एक गाडी आली. त्या गाडीतून विमानातला तो लठ्ठंभारती उतरला. मधू त्याच्याकडं पाहून अगदी ओळखीचं हसली. पण त्यानं मुळीच ओळख दाखवली नाही. उलट रागानंच तो मधूकडे पहात होता. जणू काही ती त्याची शत्रूच होती.

तो हळूहळू मधूच्या जवळ आला. मधूच्या एक गोष्ट लक्षात आली. आता त्याचं पोट विमानात वाटलं होतं तेवढं मोठं दिसत नव्हतं. असं कसं ?

तो मधूच्या जवळ येऊन उभा राहिला आणि त्यानं त्या माणसांना विचारलं, " सापडला बूट ? "

" नाही कुरेशीसाहेब. म्हणून तर या पोरीला इथं आणायला या फ्रान्सिसला सांगितलं. तो लगेचच पैसे मागत होता. आम्ही म्हटलं आधी पाचशे घे न् मग बूट सापडला की उरलेले घे— "

" खोटं बोलतोस काय रे ! अहो कुरेशीसाहेब, या लोकांनी आमच्या फ्रान्सिसकाकांना मारलं आणि वर— "

" ए ! गप्प बसतेस का तुलाही हवा काही खाऊ ?"

" तिला मारू नकोस सय्यद ! काम झालं तर या पोरीकडूनच होईल. "

असं म्हणून तो ढेरपोटचा–म्हणजेच कुरेशीसाहेब–तिच्या जवळ आला, आणि मोठ्या मायेनं त्यानं विचारलं, " मला ओळखलंस का तू माधुरी?

" हो ! तुम्ही आणि मी जवळ जवळच नव्हतो का बसलो? पण काय हो तुम्ही हरवल्याचं काका म्हणत होते. तुमचा पत्ता लागत नाही असा शेरा मारलाय म्हणे विमान कंपनीनं. मग आता तुम्ही सांगितलंत का त्या लोकांना तुम्ही सापडला ते ! "

" अं– हो - सांगणार आहे. पण माधुरी तुला म्हणे माझा बूट सापडलाय."

" तो सोन्याचा ना ? अहो सापडला होता, पण आता नाही तो माझ्याजवळ, त्या झोपडीतल्या लोकांनी घेतला बहुतेक. "

" खोटं ! आमच्याजवळ मुळीच नाही तो बूट ! "

तो सय्यद का कुणीतरी मध्येच ओरडला. मधूनं चमकून पाहिलं. खरंच की, त्या झोपडीतल्या त्या लोकांच्यासारखाच हा

दिसत होता. आणि –आणि मघाशी दवाखान्याच्या त्या बागेत फ्रान्सिसशी बोलणारा माणूसही त्यातलाच होता, त्यावेळी कसं नाही ध्यानात आलं आपल्या ? अनायसेच सगळा उलगडा झाला असता. काकाही तिथंच होते. कसल्या नादात होतो आपण !

मधू स्वतःवरच चिडली. पण आता चिडून काय होणार होतं ? यातून काहीतरी मार्ग काढायलाच हवा होता. काय करायचं ! मघाशी वाटेत दिसली ती नक्की नीलूताईच होती. फ्रान्सिसनं गाडी थांबवली असती तर ?

मधूचे डोळे एकदम लकाकले. तिला एक युक्ती सुचली. ती चटकन् कुरेशीच्या जवळ गेली. त्याचा हात धरून म्हणाली, " चाचाजी, तुमचा बूट मला सापडला होता पण तो त्या एअर-होस्टेसनं घेतला."

" ती–ती जिवंत आहे ?"

" होय चाचाजी. या सय्यदला माहीत आहे. मला तिनंच यांच्या झोपडीत नेलं होतं."

" बेवकूफ ! माझ्याशी बेईमानी ?"

कुरेशी संतापानं सय्यदला बोलला. सय्यद चांगलाच घाबरला होता. मधूला ते पाहून जरा बरं वाटलं. मग मधू फ्रान्सिसजवळ गेली. त्याला हळूच म्हणाली," फ्रान्सिसकाका, मी सांगते ते ऐकलंत तर मी तुमचं नाव काकांना सांगणार नाही. ऐकणार ?"

पैशाच्या लोभानं फ्रान्सिस या लोकांच्या मागे लागला होता. आता पैसे तर मिळणार नव्हतेच पण जिवावरही बेतलं होतं. जीव वाचला तरी नोकरीची खात्री नव्हतीच. फ्रान्सिसनं मानेनंच होकार दिला.

इकडे कुरेशी सय्यदला चांगलाच झापत होता. मघाशी फ्रान्सिसवर तुटून पडणारा सय्यद कुरेशीसाहेबांच्या समोर जसा हीनदीन झाला होता. एकदम गोगलगाय.

फ्रान्सिसकडून हवाला मिळताच मधू कुरेशीजवळ गेली. म्हणाली, "चाचाजी, नीलूताई इथून जवळच कुठेतरी असावी, मला मघा गाडीतून येताना दिसली. यानंच लपवून ठेवली असणार ! "

"ये हिम्मत ? " असं म्हणून कुरेशीनं सय्यदला एक लाथ मारली. तिथं असणारे आणखी दोघंही सय्यदकडे निघाले. तसा सय्यद एकदम कुरेशीच्या पायावर पडला. रडत रडत म्हणाला, "एक बार माफी द्या मालक. पण...पण ही पोरगी सांगते ते सगळं खरं नाही. तो बूट आमच्या माँनं या पोरीकडून काढून घेतला. पण तेवढ्यात ती दुसरी लडकी आली, माझ्या माँला तिनं गोड गोड बोलून फसवलं. माँला वाटलं, खरंच तो बूट चामड्याचा आहे म्हणून मग तिनं तो बूट त्या लडकीला परत केला. अल्ला की कसम ये सब सच है."

सय्यद गयावया करून बोलत होता आणि कुरेशी कपाळाला आठ्या घालून ऐकत होता. मग तो मधुजवळ आला न् म्हणाला, "माधुरी, तुला निलांबरी कुठे दिसली ते ठिकाण ओळखता येईल !"

"हो ! येईल की फ्रान्सिसकाका चला हो, आपण आलो त्या रस्त्यानं मागे जाऊ ! तुम्हाला आठवतंय का, मी तुम्हाला गाडी थांबवायला सांगितलेलं ? तिथंच दिसली ती मला. चला, चला पटकन् ! नाहीतर पुन्हा हरवेल ती. "

" पण ताईसाहेब, गाडीची किल्ली ? "

" चाचाजी, आमच्या गाडीची किल्ली तुमच्या या माणसांनी फेकून दिलीय. मग आता ! "

" माधुरी आपण माझ्या गाडीनं जाऊ ? माधुरी तो बूट सापडला तर मी तुलाखूप मोट्ठं बक्षीस देईन. फार महत्त्वाचा बूट आहे तो ! "

" सोन्याचा आहे ना तो ? "

यावर कुरेशी फारसं बोलला नाही. त्यानं आपल्या ड्रायव्हरला गाडी चालू करायला सांगितली. मधूनं फ्रान्सिसचा हात धरला न् हळूच त्याला चिमटा घेतला. गाडी चालू होणार तेवढ्यात मधू म्हणाली, " चाचाजी, गाडी फ्रान्सिसला चालवू दे. कारण तो बरोबर नेईल. सारखं सांगायला नाही लागणार. आणि फ्रान्सिस-काका मी तुमच्याशेजारी वसते हं. म्हणजे ती जागा आली की मी लगेच तुम्हाला सांगते. चालेल ना चाचाजी ? "

मधू फार गोड आणि आर्जवी बोलत होती. कुरेशीसारखा माणूसही त्याच्या नकळत तिला होकार देऊन गेला.

फ्रान्सिस आणि मधू पुढे बसली. मधूच्या शेजारी बसला एक कुरेशीचा कुणीतरी माणूस. कुरेशी आणि त्याचे आणखी दोघं साथीदार बसले मागच्या सीटवर.

मधू फ्रान्सिसला म्हणाली, " फ्रान्सिसकाका मघाशी आणलंत त्याच वाटेनं चला, आणि गाडी जरा सावकाश चालवा बरं का नाहीतर मघासारखं व्हायचं. नीलूताई दिसते न् दिसते तोच गाडी मैलभर पुढे जायची. "

" अरसं ! म्हणजे हा फ्रान्सिस त्या सय्यदला सामील आहे काय ? काय रे ? "

"नाही साहेब, तसं नाही. सय्यदनं मला हे प्रकरण मुळीच सांगितलं नव्हतं. या माधुरीला घेऊन ये एवढंच तो बोलला. त्याप्रमाणे मी घेऊन आलो न् आता साला माझे पैसे बुडवायला पाहातोय."

"त्या सय्यदची मी चामडीच लोळवणार आहे. एकदा तो बूट सापडू दे; मग बघतो एकेकाकडे."

कुरेशी रागानं बोलत होता. मधूच्या शेजारी बसलेला त्याचा माणूस मधून मधून त्याची री ओढत होता. मधू मात्र मुकाट्यानं बसली होती. तिच्या डोक्यात विचारांचं मोहळ उठलं होतं. नीलूताई कुठल्या बाजूला दिसली हे ती आठवत होती. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजा कुठं नाहीसा झाला होता. कुरेशी दुष्ट माणूस होता यात संशय नाही. ती कुठल्यातरी टोळीच्या तावडीत सापडली होती. तो बूट खास महत्त्वाचा होता, त्या-शिवाय निलूताई तो घेऊन अशी लपली नसती. ती एकटीच होती. तिला शोधायचं म्हणजे या दुष्ट लोकांच्या तावडीत देण्या-सारखं होतं. या फ्रान्सिसचासुद्धा वाटावा तितका विश्वास वाटत नाही. मग तिनं एकटीनं काय करावं ?

मधूनं अलीकडे अशा गोष्टी खूप वाचल्या होत्या. त्यातले चांगले लोक दुष्ट लोकांच्या तावडीतून सुटत होते. अनेक युक्त्या करीत होते. मधूनं अनेक गोष्टी आठवायचा प्रयत्न केला; कोणत्या पुस्तकात, कोणत्या वेळी काय करण्यात आलं हे तिनं आठवून आठवून पाहिलं. पण हा असा पळत्या गाडीत, तीही शत्रूची आणि त्यात त्या शत्रूच्या गराड्यात बसलेली एक बारा वर्षांची एकटीच मुलगी ! छे ! असा प्रसंग कुठल्याच पुस्तकात वाचलेला तिला आठवेना.

मधू मनाशी थोडी बावरली. तरीपण ती तशीच धिटाईनं इकडे तिकडे पाहात होती. आणि असं पाहात असताना तिला दूर समोर राजा दिसला. तिला वाटलं मोठ्यानं राजा अशी हाक मारावी. पण तिनं मन आवरलं. फ्रान्सिसनं तिच्याकडे रोखून पाहिलं. तिनं आपल्याला कांही दिसलं असं भासवलंच नाही. ती मुकाट्यानं वसली होती.

गाडी थोडी पुढे गेली न् मधूला ती जागा दिसली. मघाशी याच कोपऱ्यावर नीलूताई दिसली होती. पण आता तिचं कुणीच दिसत नव्हतं. राजा काही फारसा दूर नसावा या जागेपासून. काय करावं ? गाडी इथं थांबवावी की पुढे जाऊ द्यावी ? फसवावं का या लोकांना ?

मधूचा विचार होता होता गाडी बरीच पुढं आली. एका वळणावर गाडी आली न् मधू म्हणाली, ! " गाडी थांबवा. याच वळणावर मला नीलूताई दिसली होती. नक्कीच ! चांगलं आठवतंय मला. "

" इथं ? अरे पण इथं गाडी कशी थांबवता येईल. हा तर अगदी वळणावरचा रस्ता आहे. वरून कुणी आलं, किंवा खालून कुणी आल तरी आपण झटकन निसटू शकणार नाही. "

मधू मनाशी हसली. तिला हेच पाहिजे होतं. गाडी अशीच उभी रहायला हवी होती. नीलूताई मागच्या कोपऱ्यावर असणार. राजाची न् नीलूताईची गाठ पडली असेल का ? आपण मघाशी जाताना 'नीलूताई' असं ओरडलो, ते राजानं ऐकलं होतं. त्यावेळी त्यानं कान ताठ केले होते. तो बहुधा त्याच रोखानं धावला असावा. किती हुषार आहे आपला राजा !

मधूनं गाडी थांबवायला सांगितली न् फ्रान्सिननं गाडी थांबवली. मधू कुरेशीला म्हणाली, ! “ चाचाजी, आपण खाली उतरू या. मी नीलूताईला हाका मारते. माझ्या हाका ऐकून ती नक्की बाहेर येईल.”

“ शाबास बेटी. तेवढा बूट सापडला म्हणजे बघ तरी तुला काय काय देतो ते !

मधू हसली. तिच्या शेजारचा माणूस उतरला तशी ती पटकन् उडी मारून खाली आली. तिनं एकदा त्या आडवाटेच्या रानाकडे नजर टाकली. दिल्लीच्या आसपासही आपल्या लोणावळा-खंडाळ्यासारखं रान असावं याची तिला गंमत वाटली. दूरवर गव्हाची हिरवीगार शेतं दिसत होती. शेताच्याकडेनं बांबू कळकीसारखे वृक्ष दिसत होते. शेतातले लोक इथूनही स्पष्ट दिसत होते. केवढे उंच ! आणि अंगभर कपडे. मधू उगाचच इकडे तिकडे फिरत होती. एका पायाला प्लास्टर होतं. सुरुवातीला टिंगत टिंगत चालणारी मधू आता नीट चालत होती. पायाचं दुखणंही ती विसरली. आपल्याला धावता येतं का हे पाहण्यासाठी ती थोडी धावलीही. आणि असं धावता धावता तिला एक झाड दिसलं. चढता येण्याजोगं. ती त्या झाडावर चढायला लागली. तेव्हा कुरेशी तिला म्हणाला, “ बेटी, वर कशाला चढतेस ? पडशील खाली.”

“ चाचाजी नाही पडणार मी. मला सवय आहे झाडावर चढायची. आमच्या गावाला आंब्याची, जांभळाची झाडं आहेत त्यावर चढते मी. झाडावर चढून मी पाहते नीलूताई कुठं दिसते का. लपली असणार ती जवळच कुठे तरी.”

खरोखरच झाडावर चढण्यात तिचा हेतू तोच होता. राजा किंवा नीलूताई कुठं दिसतात का ते पाहून ठेवायचं, आणि मग या लोकांच्या हातावर तुरी देऊन पळून जायचं. ती झाडावर चढायला लागली तसा कुरेशी तिला म्हणाला "बेटी ही दुर्बिण घे. म्हणजे तुला अधिक चांगलं दिसेल."

मधूला आयतीच मदत मिळाली. वा ! न मागता हवं ते मिळालं. मधूनं दुर्बिण गळ्यात घातली, न् त्या मोडक्या पायानंच ती वर चढली. तिनं दुर्बिण डोळ्यांना लावली. इकडे तिकडे पाहिलं न् ती दचकली. तिचे काका वापरत असलेली लाल गाडी खालच्या बाजूनं सुसाट येत होती. काका, की काकांची ही गाडी कुणी पळवली ? तिनं दुसऱ्या बाजूला दृष्टी फिरवली. तिचे डोळे आनंदानं लकाकले. तिला दिसली होती त्याच कोपऱ्यावर तिची नीलूताई होती. जवळच राजा उभा होता. दुर्बिणीमुळे मधूला नीलूताई खूप जवळ वाटत होती पण तिला माहीत होतं, नीलूताई वाटतेय तेवढी खासच जवळ नाही.

तिनं मान वळवली न् पुन्हा त्या लाल गाडीकडे नजर लावली. गाडी जवळ जवळ येत होती. आता गाडी स्पष्ट दिसत होती. गाडी आणि गाडीतली माणसंही. गाडी उघडी होती. तिचा टप खाली पाडला होता. गाडी काकू चालवीत होती. काकू ? आणि या बाजूला ! काकूच्या शेजारी कोण आहे ? बाप रे ! तो मघाशी हॉस्पिटलच्या दारात फ्रान्सिसशी बोलणारा माणूस ! म्हणजे त्या दुष्ट सय्यदचा भाऊ ? आणि मागे ? मागेही दोनचार लोक आहेत. काय करावं मधूला कळेना. काकूही या दुष्टांच्या तावडीत सापडली का काय ?

मधू झाडावरच होती. खालून कुरेशी अधीरपणानं तिला विचारीत होता. "दिसते का ? दिसली ? कुठं आहे ?"

मधू एकदा त्या गाडीकडे न् एकदा नीलूताईकडे पहात होती. मधूला नीलूताईनं कसलीतरी खूण केल्याचा भास झाला. ती खूण कुणाला होती ? तिला ? छे, ती तर नीलूताईला दिसणंच शक्य नव्हतं. मग ?

कुरेशीच्या प्रश्नांना कधी हो—कधी नाही करीत मधू झाडावरच बसली होती. खालची गाडी जवळ आली, तशी मधू पटकन् खाली उतरली न् म्हणाली, "चाचाजी, दिसली पण ती तिकडे झाडाआड लपली आहे. खालच्या बाजूला. हे लोक इथंच थांबू द्या. आपण दोघंच खाली जाऊ. या सर्वांना पाहिलं तर ती पुन्हा पळेल. नाही का ?"

कुरेशी अगदी अधीर झाला होता. मधूचा हात धरून तो भराभरा निघाला. मधूनं त्याला खालच्या अंगाला नेला न् नेमकी ती लाल गाडी समोर आली. मधू ओरडली, "काकू ! काकू !"

खर्रकन् गाडीचा ब्रेक दाबला गेला. काकूनं मधूला जवळ जवळ उचलूनच घेतलं. कुरेशीच्याभोवती त्या चार माणसांनी वेढा घातला. काकू म्हणाली, "मधू, तू ही अशी या बाजूला कशी आलीस ? तुझे काका नको नको म्हणत असतानाही मी निघाले पोरी. मला धीर धरवेना."

"पण मी इकडे आले हे तुला कसं कळलं !"

"बराच वेळ झाला तरी तू परत आली नाहीस, म्हणून मी हॉस्पिटलला फोन केला. काका म्हणाले, तू केव्हाच गेलीस. आणि

मग त्यांना संशय आला. या महंमदला फ्रान्सिससशी बोलताना त्यांनी पाहिलं होतं. धरलं त्याला. हे सारे मागे बसलेले, आपले म्हणजे आपले सैनिकच आहेत. आपल्याच बंगल्यावर आहेत. त्यांना घेतलं. या महमदला घेतलं न् आले."



त्या दोघी असं बोलत असताना कुरेशीनं पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण त्या ढेरपोटयाला का पळता येणार होतं ? मग मधूनं सगळी हकीकत सांगितली. नीलांबरीची—राजाची.

काकूनं ते ऐकलं न् एक जोराची शिट्टी वाजवायला एका सैनिकाला सांगितलं. तसा राजा धावत धावत धापा टाकीत आला. काकूला पाहताच त्यानं उडी मारली. मधूला हुंगलं न् परत मागे निघाला. काकू हसली न् म्हणाली, " राजा थांब, मला सगळं माहीत, आहे. एकदा या लोकांचा बंदोबस्त करू न् मग जाऊ तिकडे."

असं म्हणून काकूनं त्यातल्या एका सैनिकाला परत मागे धाडलं. थोड्याच वेळात तिथं एक जीप आली. जवळच्याच गावात एक पाहाऱ्याची चौकी होती, तिथून ही मदत मागवली होती. मधूच्या मनात आलं, आपली ही काकू किती हुषार आहे. एखाद्या हुषार गुप्तहेरासारखी वागतेय.

जीप पाहताच कुरेशी सटपटलाच. तो आणि त्याचे साथीदार, यांना जीपमध्ये घालून परत पाठवलं आणि काकू-मधू व नेमक्याच त्या चार माणसांना घेऊन राजा नेत होता तिकडे गेली. राजानं नेमकं नीलांबरीच्या समोर नेऊन उभं केलं. मधूला पाहताच नीलांबरी धावत आली. मधूला जवळ घेऊन म्हणाली, " मधू-मधू, तू भेटलीस. मला वाटलं –'

"मी मेले असंच ना! अग खरंच नशीब म्हणूनच मी वाचले "

"आणि मीही मधू ! गेले तीन दिवस मी ही अशी या रानात लपून बसलेय. अन्न नाही, काही नाही अशी. पण तो बूट जीवापाड संभाळत होते."

" पण नीलूताई त्या बुटापायी हे एवढं रामायण घडलं. खरंच का तो सोन्याचा आहे."

"होय ग. बूट तर सोन्याचा आहेच, पण त्या बुटात एक फार महत्त्वाचा कागद सापडला मला. तो कुरेशी नावाच्या कुणा माणसाला — "

"अग तो कुरेशी म्हणजेच माझ्या शेजारचा ढेरपोट्या.त्याचाच तो बूट !"

" नुसता बूटच नाही. आणखी पुष्कळ गोष्टी आहेत त्याच्या. त्याच्या ताब्यात काय काय होतं याची सगळी यादी त्या बुटात होती. हिरे, घड्याळं. "

" म्हणजे–म्हणजे तो–तो स्मगलरच की–ग. " मधू ओरडली.

काकू म्हणाली, " ए, आता आधी घरी चला. या रानात आणखी काही नको घडायला. मधू, तुझी नीलूताई उपाशी आहे हे विसरलीस वाटतं ! "

" अय्या, खरंच की ग ! नीलूताई आता सरकार तुला नक्की मोठ्ठं बक्षीस देईल. "

" मला नाही. खरं तर तुलाच द्यायला हवं. तूच तो बूट ओळखलास. "

" बरं बरं ! आता घरी चला. मी दोघींना छान बक्षीस देईन. कोणतं ते विचार ना मधू ? "

" माहीत आहे मला. मला कापड, आणि हिला साडी. दुसरं काय तू देणार ? "

" अं हं ! तुला एक छानशी वहिनी ! हिला एक झक्कास असा नवरा. मधू, तुझा दादा येणार आहे आज रात्री. अपघात झाल्याचं वाचलं न् लगेच निघालाच. तार आली त्याची. काय ग–नीलू–चालेल ना ? "

नीलांबरी हसली. सुकली होती तरी छान दिसली. मग हळूच म्हणाली, " मी पाहिलंय त्यांना. "

" खरं ! कधी ग ? लबाड मला नाही ना सांगितलंस ? कट्टी जा तुझ्याशी. "



" ए, एवढी मोठ्ठी गुप्तहेर, अशी रुसते वाटत ? काकू, ही काही अजून मुळीच मोठी नाही झालेली. अग खुळे, त्यांच्या विमानाची मीच एअरहोस्टेस होते."

मधूला सगळ्याच योगायोगांची मजा वाटली. सगळ्यात मजा आली ती काकूच्या उघड्या गाडीतून, राजाच्या गळ्यात हात घालून परत जाताना. आता काय काय गंमत होणार होती. कुरेशी आणि त्याच्या लोकांना शिक्षा, काकांना बढती, दादाचं लग्न आणि मधूला राजा ! राजाशी खेळण्यात अभ्यास चुकवायचा नाही हे मधू स्वत:लाच बजावीत होती. नाहीतर मम्मी ओरडली असती– आणि– ! नकोच ते. मम्मी-बाबा, सर्वांनाच खूष करायचं होतं तिला. खूप अभ्यास करून. खूप शहाणी होऊन.

विचार करता करता मधूनं सहज कुडत्याच्या खिशात हात घातला. तिच्या हाताला मघाचं ते बिस्किट लागलं. तिनं ते राजा-

पुढे टाकलं. राजानं तिच्याकडे मान वर करून पाहिलं, न् ते बिस्किट एका क्षणात गट्टम केलं. मधूनं त्याच्या डोक्यावर टप्पल मारली न् म्हणाली, " अरे लबाडा ! दुसऱ्यानं टाकलेलं बिस्किट तू खात नाहीस हो ! बघ काकू, कसा शहाणा आहे माझा राजा. "

काकू हसली. तिनं राजाला थोपटलं न् मधूचा एक झकास पापा घेतला.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र ...१०५५ दिनांक ......
विषय ...किशोर क्र... ५५२..

BVBK-0401055